
MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष विसावे / अंक ६ / जून २०१९

## संपादकीय

### केल्याने देशाटन.....

''केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार; मानवा चातुर्य येतसे फार'' असे एक वचन आहे. या वचनाचा पदोपदी आपल्याला अनुभव येत असतो. केवळ दुसऱ्या देशात जाऊन आला म्हणजे शहाणपण येईलच असे नाही. ते येण्यासाठी देशाटनाचे आयोजन पद्धतशीरपणे करणे आवश्यक आहे. असा प्रयत्न विद्या प्रसारक मंडळ मागील पंधरा वर्षांपासून करीत आहे. या मंडळाच्या वतीने दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत इंग्लंडची सहल आयोजित करण्यात येते. याची सुरुवात झाली २००४ पासून. त्यावर्षी फेब्रुवारी महिन्यात लंडनच्या न्यू हॅम परिसरातील सुमारे वीस शिक्षक भारत भेटीवर आले होते. भारतातील शालेय शिक्षणाचा अभ्यास करण्याचा त्यांचा उद्देश होता. त्यासाठी आम्ही त्यांना ठाणे परिसरातील शाळांमध्ये घेऊन गेलो. या निमित्ताने ब्रिटिश आणि भारतीय शिक्षक एकमेकांच्या संपर्कात आले. आपल्याला एकमेकांपासून शिकण्यासारखे खूप आहे हे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे भारतीय शिक्षकांनी इंग्लंडला जाऊन तेथील शिक्षण प्रणाली बघण्याची इच्छा व्यक्त केली. याला ब्रिटिश शिक्षकांनी अनुकूल असा प्रतिसाद दिला. त्याच वर्षी नोव्हेंबर महिन्यात आम्ही भारतीय शिक्षकांची पहिली सहल आयोजित केली. यात प्रामुख्याने विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. बेडेकर विद्या मंदिर आणि सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा या दोन शाळांतील शिक्षक होते. ती सहल फारच यशस्वी ठरली.

फेब्रुवारी २००५ मध्ये ऑक्सफर्डशायर परगण्यातील शिक्षक भारत भेटीवर आले. परत जाताना त्यानी ऑक्सफर्डशायरला येण्याचे निमंत्रण दिले. त्यानुसार २० शिक्षकांची एक तुकडी घेऊन आम्ही जून महिन्यात ऑक्सफर्डला गेलो. कबूल केल्याप्रमाणे त्यांनी आमची चांगली व्यवस्था केली. शाळाभेटी बरोबरच त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठातील काही कॉलेजिसना देखील आमच्या भेटी आयोजित केल्या. ऑक्सफर्ड हे सध्या अस्तित्वात असलेल्या विद्यापीठातील सर्वात जुने असे विद्यापीठ आहे. कॉलेज भेटीने शिक्षक भारावून गेले. तिथे उपलब्ध असलेल्या शैक्षणिक संधींची माहिती भारतीय मुलांना होण्याची गरज आहे असे आग्रही प्रतिपादन अनेक शिक्षकांनी केले. त्यांच्या सूचनेचा विचार करून त्याच वर्षी नोव्हेंबर महिन्यात आम्ही केवळ विद्यार्थ्यांसाठी एक वेगळी सहल आयोजित केली होती. यात शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा भरणा होता. या सहलीत ऑक्सफर्ड, केंब्रिज आणि लंडन या तीन शहरांचा समावेश करण्यात आला होता. या शहरांतील संग्रहालये,

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

वाचनालये, शैक्षणिक संस्था, त्याचबरोबर काही प्रेक्षणीय स्थळांना आम्ही भेटी दिल्या. ही सहल फारच यशस्वी झाली. सहलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आम्हाला सांगितले की, या भेटीतून त्यांना वेगवेगळ्या अभ्यासक्रमाची माहिती मिळाली. त्याचबरोबर, आपण भविष्यात काय करावे याची दिशा त्यांना मिळाली.

सहलीत सहभागी झालेल्या सर्वच शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी इंग्लंडची शैक्षणिक सहल खूप उपयोगाची असल्याचे सांगितले. म्हणून आम्ही ही सहल दरवर्षी करण्याचे ठरविले. परंतु त्यात दोन बदल केले. नोव्हेंबर महिन्यात हिवाळ्याची सुरुवात झालेली असते. त्यामुळे वातावरणात गारठा येतो, त्याचबरोबर दिवसही लहान होतो. म्हणून आम्ही सहलीचे आयोजन उन्हाळ्यात करायचे असे ठरविले. त्याचबरोबर केवळ शिक्षकांसाठी किंवा केवळ विद्यार्थ्यांसाठी सहल आयोजित न करता दोन्ही गटांना एकत्र घ्यायचे ठरविले. यामध्ये उत्साही पालकांचा देखील आम्ही समावेश करू लागलो. अलीकडच्या काळात ज्या सहली आयोजित करण्यात आल्या त्यामध्ये विद्यार्थी, शिक्षक आणि पालक असा तीन गटांतील व्यक्तींचा समावेश होता. या सहलींचा कालावधी १२ दिवसांचा असतो. सहलीच्या आधी सहभागी सभासदांसाठी शैक्षणिक सत्रे आयोजित केली जातात. या सत्रांमध्ये त्यांना युनायटेड किंगडमची जुजबी माहिती दिली जाते. या देशाचा इतिहास आणि या देशाने केलेल्या प्रगतीचा आढावा घेऊन झाल्यावर, ज्या शहरांना भेटी देणार आहोत त्या शहरांची थोडक्यात माहिती दिली जाते. त्यामुळे सहलीला जाण्यापूर्वीच सहभागी सभासदांना या ठिकाणांचा परिचय झालेला असतो.

२०१९ ची इंग्लंड सहल २१ ते ३१ मे या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. शाळकरी विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक आणि पालक असा तीस जणांचा हा गट होता. लंडनच्या हिथ्रो विमानतळावरून आम्ही लगेच केंब्रिजला प्रयाण केले. आधी शहराचा फेरफटका, नंतर संग्रहालयांना भेटी तसेच तेथील काही प्रेक्षणीय स्थळांना भेटी असा हा भरगच्च कार्यक्रम होता. त्यातील सगळ्यात लक्षात राहील अशी भेट होती ती ट्रिनिटी कॉलेजची. केंब्रिज शहरातील नामांकित असे हे कॉलेज असून आयझॅक न्यूटन, स्टीफन हॉकिंग असे सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ या कॉलेज मध्ये काम करीत होते. प्रसिद्ध भारतीय गणिती रामानुजन यांनी प्राध्यापक हार्डी यांच्या मार्गदर्शनाखाली याच कॉलेजमध्ये मोलाचे संशोधन केले. असे हे महत्त्वाचे कॉलेज आम्हाला आतून पाहायला मिळाले ते डॉ. कृष्णा शर्मा या भारतीय मुलाच्या मदतीने. हा मुलगा दिल्लीचा असून त्याने या कॉलजमध्ये संशोधन करून केंब्रिज विद्यापीठाची पीएच. डी. ही पदवी संपादन केली आहे. त्याने आम्हाला कॉलेजचे अनेक विभाग दाखविले. या कॉलेजने आजतागायत ३३ नोबेल पारितोषिक विजेते दिले हे त्याने मोठ्या अभिमानाने आम्हाला सांगितले.

केंब्रिजची भेट आटोपून आम्ही ऑक्सफर्डला पोहोचलो. केंब्रिजप्रमाणेच ऑक्सफर्डमध्ये देखील अनेक संग्रहालये आणि वाचनालये आहेत. काही निवडक ठिकाणांना आम्ही भेटी दिल्या. त्याचबरोबर तेथील बोटॅनिकल गार्डन पाहायला आम्ही गेलो. तसेच सॉमर्व्हील कॉलेजला आम्ही भेट दिली. स्त्रियांना महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे यासाठी लेडी सॉमर्व्हील यानी हे कॉलेज सुरू केले. याच कॉलेजमध्ये भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी शिक्षण घेतले. त्याचबरोबर इंग्लंडच्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर यांनी देखील याच कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. आजमितीस या कॉलजमध्ये स्त्री आणि पुरुष दोघांनाही प्रवेश दिला जातो. भारत व इंग्लंड या दोन देशांनी

(पृष्ठ क्र.३ वर)

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष विसावे/अंक ६/जून २०१९

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २३ वे/अंक १२ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | शास्त्रवेध-०९: ऊर्जेच्या एककांची कथा | श्री. नरेंद्र गोळे | ३ |
| ३) | ओळख वनस्पतींची - गुलबहार | श्री. प्रकाश दुधाळकर | ६ |
| ४) | लॉर्ड लिटन : ब्रिटिशकालीन भारताचे वादग्रस्त गर्व्हनर-जनरल | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ८ |
| ५) | झाडांना आपल्याबद्दल काय वाटतं ? | आरती कुलकर्णी | १५ |
| ६) | अँन फ्रँक : आत्ममग्न समाजभान | श्री. चन्द्रशेखर टिळक | २१ |
| ७) | प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था | श्री. मधुकर गजानन दातार | २५ |
| ८) | प्रतिज्ञा - काळाची गरज | सौ. श्रुती कर्वे-भिडे | २९ |
| ९) | परराष्ट्र धोरणापुढील आव्हानात्मक कालखंड | डॉ. शैलेंद्र देवळाणकर | ३२ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३६ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश ‘विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा’ या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# शास्त्रवेध-०९: ऊर्जेच्या एककांची कथा

*सामर्थ्याची साधना म्हणजेच ऊर्जेची आराधना आणि ती करायची तर तिची एकके माहीत असायलाच हवीत. या ऊर्जेच्या एककांबद्दलची माहिती या लेखात विशद केली आहे- संपादक*

सर आयझॅक न्यूटन (०४-०१-१६४३ ते ३१-०३-१७२७) सफरचंदाच्या झाडाखाली बसले होते. झाडावरून सफरचंद पडले. झाडापासून सुटलेले फळ पृथ्वीकडेच का खेचले जाते? हा विचार करता करता त्यांना गुरुत्वाकर्षणाचा शोध लागला. गुरुत्वाकर्षण हे बल असते. हे बल गुरुत्व म्हणजे मोठेपणाने प्राप्त होते. जेवढे वस्तुमान मोठे तेवढेच त्याचे गुरुत्वही आणि म्हणूनच गुरुत्वाकर्षणही. चंद्र पृथ्वीच्या मानाने सहापट लहान वस्तुमानाचा. म्हणून त्याचे गुरुत्वाकर्षणही सहापट कमी. याशिवाय, जर पडणारे फळ मोठे असेल तर त्यावरील ओढीचे (त्वरणाचे) बलही जास्त असणार. म्हणजे जर डोक्यावर बोर पडले तर काहीतरी पडले असे जाणवेल, सफरचंद पडले तर फटका जाणवेल, मात्र नारळ पडला तर कपाळमोक्षच व्हायचा! ही जाण, सर न्यूटन ह्यांनी गतिशास्त्राचे तीन नियम शोधून काढून विकसित केली. त्यांच्या सन्मानार्थ, मीटर-किलोग्रॅम-सेकंद प्रणालीत बलाच्या एककाला 'न्यूटन' हेच नाव देण्यात आले. एक किलोग्रॅम वस्तुमानाची गती दर सेकंदाला एक मीटर प्रती सेकंद वेगाने वाढवायची झाल्यास, लागणाऱ्या बलास (जोरास) एक 'न्यूटन बल' असे म्हणतात.

एक 'न्यूटन बल' लावून जर एक वस्तू ओढावी लागत असेल तर ती वस्तू एक मीटर दूरपर्यंत खेचत नेण्यास लागणारी ऊर्जा ही मीटर-किलोग्रॅम-सेकंद प्रणालीत एक एकक ऊर्जा म्हणतात. ह्या एककास जेम्स प्रेस्कॉट ज्यूल (२४-१२-१८१८ ते ११-१०-१८८९) ह्यांचे नाव देण्यात आले. विद्युतप्रवाहाचे औष्णिक प्रभाव शोधून काढताना ज्यूल ह्यांनी त्या साऱ्याच प्रक्रियेचे जे सम्यक आकलन घडविले, त्यास स्मरून ऊर्जेच्या एककास त्यांचे नाव देण्यात आलेले आहे.

दर सेकंदास जेवढी ऊर्जा खर्च करण्यात येते त्या ऊर्जेस अथवा ऊर्जा विनिमयाच्या दरास 'शक्ती' म्हणतात. १७९० साली सर जेम्स वॉट (१९-०१-१७३६ ते २५-०८-१८१९) ह्यांनी वाफेच्या शक्तीयंत्राचा (इंजिनाचा) शोध लावला. ह्या शक्तीचा उपयोग दळणवळणाच्या क्षेत्रात पुढे किती झाला हे सांगण्याची मुळीच गरज नाही. मात्र त्यांच्या ह्या महत्त्वपूर्ण आविष्काराच्या स्मरणार्थ 'शक्ती'च्या एककास मीटर-किलोग्रॅम-सेकंद प्रणालीत 'वॉट' म्हणू लागले. दैनंदिन जीवनात लागणाऱ्या शक्तींच्या मानाने 'वॉट' खूपच लहान आहे. म्हणून मग दैनंदिन गरजेच्या शक्तींना 'किलोवॉट' मध्ये मोजण्याची प्रथा पडली. एक किलोवॉट म्हणजे हजार वॉट शक्ती.

समजा एक हजार वॉट शक्तीचा दिवा तासभर जाळला तर जेवढी ऊर्जा लागते तिलाच ऊर्जेचे एक सर्वाधिक वापरात असलेले एकक समजले जाऊ लागले. तिला कुणाचेही नाव देण्यात आलेले नाही. मात्र त्या ऊर्जेच्या मात्रेस तुम्ही-आम्ही सर्वच जण अगदी जवळून ओळखतो. 'युनिट' म्हणून. वीजमंडळाच्या बिलात आपल्याला पुरवलेली वीज, 'युनिट' मध्येच नमूद केलेली असते.

---

एक रोग नष्ट करून दुसरा निर्माण करायचा, एवढेच काम औषधे करू शकतात. - एम. बी. एडी

| क्र. | ऊर्जा एकक | परिमाण | मूलभूत एकक | ऊर्जा क्षेत्रीय वर्णन |
|---|---|---|---|---|
| १ | १ ज्यूल | १ | J | विश्वविख्यात सिस्टिमी इंटरनॅशनली(Systeme Internationale-SI) गणन प्रणालीतील मूलभूत ऊर्जा एकक |
| २ | १ हजार वॉट तास (KWH) | ८६० | ह.कॅलरी (KC) | विद्युत अभियांत्रिकीतील ऊर्जा एकक |
| ३ | १ हजार वॉट तास | ३.६ | द.कॅलरी (MJ) | वीज-मापकातील एकक (१ युनिट) |
| ४ | १ कॅलरी (Calorie-C) | ४.१८४ | ज्यूल (J) | औष्णिक गतिशास्त्रातील ऊर्जा एकक |
| ५ | १ कॅलरी (Calorie-C) | १.१६१ | हजारांश वॉट तास | |
| ६ | १ अर्ग (Erg) | $१X१०^{-७}$ | ज्यूल | भौतिकशास्त्रातील ऊर्जा एकक (कोट्यांश ज्यूल) |
| ७ | १ ऋणक व्होल्ट (eV) | $१.६०२X१०^{१९}$ | ज्यूल | अणुऊर्जाशास्त्रातील ऊर्जा एकक |
| ८ | १ ब्रिउए (BTU*) | $१.०५५X१०^{३}$ | ज्यूल | ब्रिटिश उष्णता एकक (British Thermal Unit) |
| ९ | १ क्वाड (Quad) | $१X१०^{१५}$ | ब्रिउए | क्वाड: बहु-ब्रिटिश ऊर्जा एकके |
| १० | १ क्वाड (Quad) | $१.०५५X१०^{१८}$ | ज्यूल | |
| ११ | १ क्यू (Q) | $१X१०^{१८}$ | ब्रिउए | क्यू: बहु-ब्रिटिश ऊर्जा एकके |
| १२ | १ क्यू (Q) | $१.०५५X१०^{२१}$ | ज्यूल | |
| १३ | १ अर्ब (bbl-billion barellel) | ६.१X१०९ | ज्यूल | अब्ज बॅरल तेल सममूल्य ऊर्जा |
| १४ | १ पेटस (tep**) | $१.०८X१०^{१०}$ | कॅलरी | पेट्रोलियम टन सममूल्य ऊर्जा |
| १५ | १ कोटस (tec***) | $७X१०^{९}$ | कॅलरी | कोळसा टन सममूल्य ऊर्जा |
| १६ | १ ह.लि.वायू (cu.m gas) | $३.९४X१०^{७}$ | कॅलरी | वातावरणीय दाबात, मध्यम सरासरी दर्जाच्या १ घनमीटर नैसर्गिक वायूतील ऊर्जेच्या सममूल्य ऊर्जा |
| १७ | १ द.ग्रॅम (टन) टि.एन.टी. (tTNT) | $१X१०^{९}$ | कॅलरी | १ द.ग्रॅम (टन) टेट्रा-नायट्रो-टोल्यूइन ह्या स्फोटकातील ऊर्जेच्या सममूल्य ऊर्जा |
| १८ | १ द.ग्रॅम (टन) टि.एन.टी. (tTNT) | $४.१८४X१०^{९}$ | ज्यूल | १ द.ग्रॅम (टन) टेट्रा-नायट्रो-टोल्यूइन ह्या स्फोटकातील ऊर्जेच्या सममूल्य ऊर्जा |
| १९ | १ मेऊए (Meu) | $१X१०^{१८}$ | ज्यूल | मेट्रिक ऊर्जा एकक |
| २० | १ ह.ग्रॅम वस्तुमान | $८.९९X१०^{१८}$ | ज्यूल | १ ह.ग्रॅम वस्तुमानातील ऊर्जेच्या सममूल्य ऊर्जा |

उपसर्ग: ह-हजार, द-दशलक्ष, अ-अब्ज, नि-निखर्व, टन-१,००० किलोग्रॅम किंवा एक दशलक्ष ग्रॅम

Prefixes: K-Kilo, thousand, M-Mega, million, G-Giga, billion, T-Tera, thousand billion

* BTU-British Thermal Unit

** tep-Ton Of Petrol Equivalent, toe-Ton of oil Equivalent

*** toc-Ton of Coal eqivalent

Tetra Nitro-Toluene - टेट्रा-नायट्रो-टोल्यूइन ह्या स्फोटकातील ऊर्जेच्या सममूल्य ऊर्जा

ब्रिटिश आणि अमेरिकन एकके

वस्तुमान:१ लॉंग टन = १०१६ हजार ग्रॅम, १ शॉर्ट टन = ९०७.२ हजार ग्रॅम, १ पौंड = ०.४५४ हजार ग्रॅम

आकारमान: १ अमेरिकन गॅलन = ३.७८५ लिटर, १ इंपिरिअल गॅलन = ४.५४६ लिटर,
१ बॅरल = ४२ अमेरिकन गॅलन

शक्ती: १ अश्वशक्ती (hp) = ०.७३५३ हजार वॉट, १ मेट्रिक अश्वशक्ती = ०.७४५७ हजार वॉट

Energy (ऊर्जा) हा शब्द ग्रीकमधून आला आहे (एप = आंत, शीसेप = काम) व ॲरिस्टॉटलने वापरलेला आहे. ऊर्जेची नि:संदिग्ध व्याख्या मात्र गेल्या शतकांत औष्णिक गतिशास्त्राच्या विकासाबरोबर झाली. ऊर्जा म्हणजे असा घटक ज्यात कार्यक्षमता आणि / अथवा उष्णता असते, काम करण्याची शक्ती अनुस्यूत असते. ऊर्जा वेगवेगळ्या एककांमध्ये मोजली जाते, मुख्यत: ‘ज्यूल’ मध्ये (चिन्ह: ग). दुसरे एकक म्हणजे ‘कॅलरी’, जे गतकाळापासून उष्णतेच्या मापनासाठी वापरत. त्याची व्याख्या अशी आहे की, १ ग्रॅम पाण्याचे तापमान १ अंश सेल्सियस (१४ अंश ते १५ अंश सेल्सियस) ने वाढविण्यासाठी लागणारी उष्णता. १ कॅलरी = ४.१८४ ज्यूल. शक्ती म्हणजे वेळाच्या एका एककात (वापर किंवा उत्पादन) संक्रमित झालेली ऊर्जा, म्हणजे अर्थातच ऊर्जा-दर. शक्तीचे मुख्य एकक वॉट (चिन्ह: थ) आहे. वॉट म्हणजे १ ज्यूल / सेकंद एवढी शक्ती. ऊर्जा संकल्पनेला भौतिकशास्त्रात तसेच व्यवहारातही आज मूलभूत व नि:संदिग्ध अर्थ प्राप्त झालेला आहे.

आदिशक्तीची अनेक रूपे आपल्या संस्कृतीत सदैव पुजली गेलेली आहेत. नव्या जगाच्या संदर्भात आदिशक्तीचे सर्वव्यापी रूप 'ऊर्जा' हे आहे. ऊर्जा म्हणजे ‘ऊरात जन्म घेतलेली शक्ती’. प्राथमिकत: जैव शक्ती. मात्र ऊर्जेचा वावर वस्तुमान, भौतिक ऊर्जा आणि जैव ऊर्जा ह्या मुख्य रूपांमधून होत असल्याने ही तीन रूपे प्रमुख मानावीत.

वस्तुमानात ऊर्जा सामावलेली असते ह्याचे एक सर्वश्रुत उदाहरण म्हणजे जळण वा इंधन म्हणून वापरात येणारे सर्वच पदार्थ. त्या वस्तुमानातील ऊर्जा मोकळी केल्यावर वायुरूप प्रदूषणे आणि राखच काय ती उरते. दुसरे नेहमीच्या पाहण्यातले उदाहरण म्हणजे चंद्र. पृथ्वीवरील सागरांमध्ये भरती ओहोटींची आवर्तने चंद्राच्या वस्तुमानाच्या आकर्षणापोटीच घडत असल्याचे आपण जाणतोच. वस्तुमानात अपार ऊर्जा सामावलेली असते. अवकाशीय घडामोडींमध्ये वस्तुमानाची ऊर्जा आणि ऊर्जेपासून वस्तूमान ह्या प्रक्रिया घडतच असतात. मात्र इथे वस्तुमानरूपातील ऊर्जेचा विचार करावयाचा नाही. इथे विचार करायचा आहे तो भौतिक ऊर्जेचा. वीज, इंधन, जल-उत्क्षेपक-गती, वायुवीजन-स्फुरण, परिवहन-गती इत्यादी चिरपरिचित ऊर्जास्वरूपांचा. ह्याच ऊर्जेवरील सत्ता; व्यक्ती, समाज वा देशाला गरीब किंवा श्रीमंत बनविते. अभावानेच जिचा प्रभाव उमजू लागतो तीच ही जगन्मोहिनी ऊर्जा. हिचा उगम अवश्य ऊरात होतो. मात्र भौतिकस्वरूपातील हिचे वरील

(पृष्ठ क्र.१४वर)

# ओळख वनस्पतींची
## गुलबहार

*'गुलबहार' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

हिवाळ्यातील नागपूर भेट म्हणजे एक पर्वणी असते. सुखद गारव्यात अन् धुक्यात हरवलेल्या सकाळी नागपूरच्या परिसरात फिरतांना वेगळाच आनंद मिळतो. अशाच एका सुंदर सकाळी नागपूर जवळच्या तेलंखेडी उद्यानातून फेरफटका मारत होतो. लांबवर विविध प्रकारची झाडं धुक्याची शाल पांघरुन उभी होती. पक्ष्यांची किलबिल... वातावरण भारले होते. गवतावरचे दवबिंदू चंदेरी कोंदणात ठेवलेल्या मोत्यांसारखे दिसत होते. दूरवर विविध फुलझाडांच्या पसाऱ्यात एका अनोख्या वृक्षाने लक्ष वेधून घेतले. पूर्णपणे गुलाबी रंगाने सजलेला हा मध्यम उंचीचा वृक्ष म्हणजे तामण तर नाहीना? पण लगेच वास्तवाची जाणीव झाली ही डिसेंबरची सुरुवात आहे. तामण इतक्या लवकर फुलणार नाही. गुलाबी टॅबेबियादेखील इतक्या लवकर फुलणार नाही. टॅबेबियाचा फुलण्याचा काळ फेब्रुवारी. तेथे मग एवढा दिमाखदार वृक्ष दुसरा कोण? प्रश्न मला स्वस्थ बसू देईना. पाय लांबवर दिसणाऱ्या त्या गुलाबी ठिपक्याकडे वळले. उद्यानातील ॲक्वेरियमच्या मागच्या बाजूला हा एकमेव वृक्ष दिमाखात फुलतो आहे.



जसजसा वृक्षाच्या जवळ जात होतो तसा गुंता अजून वाढत होता. माहीत असलेले सर्व वृक्ष आठवूण झाले. यावेळी गुलाबी फुलांनी फुलणारा कांचन वगळता दुसरा वृक्ष आठवत नव्हता. हा कांचन तर नक्कीच नाही. कारण कांचन फुलला तरी आपली हिरवाई राखून ठेवतो. इथे हिरवेपणा नावालाही नाही. सर्वत्र गुलाबी फुलांचे गोल गोंडे झाडभर विखुरलेले दिसत होते. जवळ पोहचताच त्याच्या सौंदर्याने भारावून गेलो. हा गुलाबी रंग कांचन तामण किंवा गुलाबी टॅबेबियापेक्षा काही वेगळा होता. गर्द गुलाबी रंगाची शाल पांघरलेला हा राजबिंडा वृक्ष कोण? प्रश्न मला पुनः पुनः डिवचत होता.

चहुबाजूंनी फुलून आलेल्या गोल गेंदामध्ये कातरलेल्या जाड पाकळ्यांनी पेल्याच्या आकाराची अडीच ते तीन इंच लांबीची ही मोहक फुले मध्यभागी असलेल्या गर्दगुलाबी रंगामुळे फारच सुंदर दिसत होती. काही फुलांच्यामध्ये पिवळा रंग गुलाबी रंगाची शोभा वाढवत होता. हा पिवळा रंग हळूहळू गर्द गुलाबी होतो. एवढ्या सुंदर फुलांना वास मात्र अजिबात नाही. झाडावर सतत गर्दी करणारे शिंजीर पक्षी व मधमाशा फुलांमध्ये भरपूर मकरंद (Neetor) असल्याची ग्वाही देत होते. फुलामधला मध चाखणाऱ्या शिंजिराकडे लक्ष गेलं. फुलांची लांबी व त्याची चोच यांच्या व्यस्त प्रमाणामुळे फुलातील मध काही त्याला पिता येत नव्हता. तो फांदीला लटकला, आपली अणकुचीदार चोच फुलाच्या देठाजवळच्या पेलाकार नाजूक भागात टोचून त्याने आपला कार्यभाग साधला. शिंजिराच्या शॉर्टकटमुळे फुलांचे परागीकरणाचे काम पूर्ण करण्याची जबाबदारी आता केवळ मधमाशांवरच पडणार. अशा बऱ्याच फुलांच्या बाबतीत

शिंजीर पक्षी ही युक्ती वापरतात. एरवी जास्वंदीसारख्या फुलांसमोर पंख हलवित एकाच ठिकाणी स्थिर होऊन मधुरसाचा आस्वाद घेतांना शिंजिरांना (Sunbira) आपण पाहिले असेल. आकाशाकडे विस्तारलेल्या प्रत्येक फांदीच्या टोकांवर हे गर्द गुलाबी, किरमिजी रंगाचे गेंद विस्तीर्ण निळ्या पार्श्वभूमीवर फारच खुलून दिसत होते. झाडावरील फुलांच्या पसाऱ्यात पानांचं अस्तित्व कुठेच जाणवत नव्हतं. जरा बारकाईने पाहिल्यावर खालच्या बाजूच्या फांद्यांवर काही पिकलेली पाने आढळली ती आता गळायच्या तयारीत होती. या पानांमुळेच या सुंदर वृक्षाचा शोध घेता आला. दोन दिवसानंतर तेही शक्य झाले नसते. हाताच्या पंजासारखी पाच पाने असलेले हे संयुक्त पान पाहून लगेच याची ओळख पटली,- अरे हा तर टॅबेबिया. मुळचा दक्षिण अमेरिकेतील हा वृक्ष आता भारतात सर्वत्र दिसतो. त्यापैकी पिवळा टॅबेबिया Tabebuia argentia व गुलाबी टॅबेबिया Tabebuia rosea ही झाडे सर्वत्र दिसतात. मुंबईत सध्या छत्रपती शिवाजी टर्मिनसच्या परिसरातील गुलाबी टॅबेबियाची झाडे मस्त फुलली आहेत. त्या तुलनेत पिवळा टॅबेबिया मुंबईत कमी दिसतो. पुण्यामध्ये मात्र पिवळा टॅबेबिया मस्तच बहरला आहे, परंतु नागपूरला पाहिलेला गर्द गुलाबी रंगाच्या गेंद फुलांच्या टॅबेबिया मात्र यापेक्षा जरा वेगळा आहे. याच्या फुलांची रचना व फुलण्याचा काळ देखील जरा लवकरचा आहे. जेव्हा सर्व झाडे आपला पर्णसंभार उतरवू लागतात त्यावेळी हा मात्र जोमात फुललेला असतो. जानेवारी संपता संपता याचाही बहर ओसरून हाताच्या पंजासारख्या पानांनी व सहा-सात इंच लांबीच्या बारीक हिरव्या शेंगांनी झाड भरून जातं. मध्यम उंचीचा हा दुर्मीळ वृक्ष टॅबेबिया अव्हेलांडी (Tabebuia avellauedae ) या नावाने ओळखला जातो. हा सुंदर राजबिंडा वृक्ष मुंबई परिसरात फारसा दिसत नाही. विद्यापीठ परिसरात Tabebuia Pentaphylla याची काही झाडे आहेत. मात्र Tabebuia vellanedea या प्रकारची झाडे मुंबईत फारशी दिसत नाहीत. टॅबेबियाच्या २४ ते २५ जाती आहेत. टॅबेबिया हा मूळचा ब्राझील दक्षिण अमेरिका व मध्य अमेरिका या देशातील वृक्ष आहे. आता अनेक देशांत त्याचा प्रसार झाला आहे. भारतात काही मोजक्याच जातींचा प्रसार झाला. इतर अनेक जातींचा इथे प्रसार करण्यास बराच वाव आहे. सोसायट्या व उद्यानांत याची लागवड करायला मुळीच हरकत नाही. टॅबेबिया हा मूळचा इथला नसल्याने याबाबत फारसा प्रसार झाला नाही. या झाडाचे लाकूड किडरोधक व मजबूत असल्याने होड्या बांधणी उद्योग तसेच फर्निचरसाठी उपयुक्त आहे. या झाडाचे बरेच औषधी उपयोग देखील आहेत. विविध जाती निहाय ते वेगवेगळे आहेत. हा मूळचा भारतीय वृक्ष नसल्याने याबाबत भारतात फारशी माहिती नाही किंवा आयुर्वेदात उल्लेख असण्याचे कारण नाही. शोभेची झाडे या प्रकारात मोडणारी किंवा वैशिष्ट्यपूर्ण झाडे जी आपल्याकडची नाहीत, पण या वातावरणात जगू शकतात ती काही प्रमाणात राखीव उद्याने व बागांमधून लावावयास हरकत नाही. मात्र याचा अतिरेक टाळावयास पाहिजे. दळणवळणाच्या सहजतेमुळे बेशरमसारखी बरीचशी झाडे भारतात आगंतुकपणे आली व येथील परिसराचा कब्जा घेऊन इथल्या पर्यावरणाला मारक ठरली. मात्र टॅबेबियाचे तसे नाही. या वृक्षाची लागवड मुद्दाम केल्याशिवाय तो रुजत नाही. मी पाहिलेला टॅबेबिया अव्हेलांडी तर रुजायला फारच कठीण. बियांपासून सहज न रुजणारा त्यामुळे दुर्मीळ. भारतीय नसल्याने याला भारतीय नाव नाही. यांच्या सुंदर रंगामुळे व फुलांचे गेंदासारखे गुच्छ बघून याला देण्यात आलेले 'गुलबहार' हे भारतीय नाव खरोखरचे समर्पक वाटते.

**- प्रकाश दुधाळकर**
एफ-२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर-नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई - ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी - ९८६९५४१९६६

●●●

मनाची उंची मोजायची असेल, तर ते कोठवर सावली टाकते ते पाहा. - आर. ब्राऊनिंग

# लॉर्ड लिटन : ब्रिटिशकालीन भारताचे वादग्रस्त गव्हर्नर-जनरल
## भाग – २

*ब्रिटिशकालीन भारताचे गव्हर्नर–जनरल लॉर्ड लिटन यांच्या वादग्रस्त कारकिर्दीचा आढावा घेणारा लेख – संपादक*

लिटन यांच्या काळात १८७६ ते १८७८ अशा दोन वर्षांच्या काळात भारतामध्ये भीषण दुष्काळ पडला होता. असे म्हटले जाते की, या दुष्काळामुळे जवळ जवळ २,५७,००० चौरस मैल एवढे क्षेत्रफळ असलेला भारतातील भूभाग होरपळून निघाला होता. या दुष्काळाची गडद छाया प्रकर्षाने मद्रास, मुंबई, म्हैसूर, हैदराबाद मध्ये भारताचा काही भाग तसेच पंजाबमध्ये पडली होती. परंतु लिटन साहेबांच्या नेतृत्वाखालील ब्रिटिश सरकारने दुष्काळ निवारणासाठी मोठी पाऊले उचललेले वा दुष्काळग्रस्तांना सढळ हस्ते मदत केल्याचे निदर्शनास येत नाही. या दुष्काळात लाखो लोक मृत्युमुखी पडल्याची माहिती आपणास काही इतिहासकार देतात. सरकारने दुष्काळग्रस्तांना दिलासा देण्यासाठी जवळपास एक कोटी पौंड एवढी रक्कम विविध मदतकार्यांवर खर्च केली होती. मात्र, दुष्काळाची दाहकता व त्याने व्यापलेला विशाल प्रदेश पाहता ही रक्कम फारच कमी होती असे जाणवते. भारतात पडणाऱ्या दुष्काळांचा अभ्यास करून त्यावर आवश्यक ती उपाययोजना सुचविण्यासाठी लिटन यांनी सर रिचर्ड स्ट्रॅची यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमली होती. या समितीने दुष्काळ निवारणासाठी विविध उपाययोजना सुचविल्याचे निदर्शनास येते. यातील काही सुधारणा पुढीलप्रमाणे होत – दुष्काळग्रस्त प्रदेशातील धडधाकट लोकांना म्हणजेच शारीरिक कष्ट करण्यास समर्थ असणाऱ्या लोकांना विविध कामे देऊन व ती त्यांच्याकडून करून घेऊन त्यांना पैश्याच्या स्वरुपात मोबदला द्यावा, वृद्ध व अपंगांना काम न करता मदत देण्यात यावी, दुष्काळग्रस्त प्रदेशातील लोकांची राहण्याची सोय करून त्यांना वैद्यकीय मदतदेखील द्यावी, जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने जिल्ह्यातील जनतेच्या मदतीने विविध मदत योजना राबवाव्यात, आवश्यक असेल तेथे सरकारने शेतसारा माफ करावा, शेतकऱ्यांना बियाणे व शेतीची इतर उपकरणे विकत घेण्यासाठी कर्ज देण्यात यावे, इत्यादी. या समितीने दुष्काळग्रस्तांना दिलासा देण्यासाठी इतरही काही सूचना केल्याचे निदर्शनास येते. स्ट्रॅची कमिशनने आपला अहवाल १८८० साली सादर केला होता व सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे दुष्काळी भागात मदत कार्य करण्याची जबाबदारी सरकारची असल्याची बाब या समितीने तत्त्वतः मान्य केल्याचे दिसते. तसेच या समितीने खबरदारीचा उपाय म्हणून लोहमार्ग बांधण्याची व जलसिंचन प्रकल्पांवर दुष्काळग्रस्तांना काम देण्यात यावे अशी सूचना केली होती.

लिटन यांनी १८७८ साली शस्त्रबंदीचा कायदा केला. या कायद्याला वर्णद्वेषाचा वास होता यात वाद नाही. याचे कारण या कायद्याने भारतीयांनी परवान्याशिवाय शस्त्रे बाळगू नयेत असे जाहीर करण्यात आले. परंतु या कायद्यातून गोऱ्या युरोपियनांना व अँग्लो–इंडियन्सना वगळण्यात आले होते. म्हणजे हा उघड–उघड वर्णभेद वा वंशभेद केलेला होता. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास तीन वर्षांची कैद वा दंड किंवा कैद व दंड या दोन्ही शिक्षा देण्याची तरतूद होती. तसेच विनापरवाना शस्त्र बाळगून ते लपविण्याचा प्रयत्न केल्यास व ते उघडकीस आल्यास सात वर्षांची कैद वा दंड किंवा कैद व दंड अशा शिक्षेचे प्रावधान करण्यात आले होते. या

कायद्यामुळे ब्रिटिश शासन काळा-गोरा असा भेद करते ही बाब अधोरेखीत झाली. येथे मुद्दा शस्त्र बाळगण्याचा नव्हता तर समानतेचा होता.

१८३३ च्या चार्टर ॲक्टनुसार भारतातील प्रशासकीय सेवेतील सर्व पदे भारतीयांसाठी खुली असल्याचे म्हणजेच गुणवत्तेच्या आधारावर भारतीयांना या पदांवर नियुक्त करावे अशा प्रकारची तरतूद करण्यात आली होती. १८५३ च्या चार्टर ॲक्टनुसार भारतातील कंपनी सरकारच्या प्रशासनातील उच्च पदांवरील नियुक्त्या करण्यासाठी लंडनमध्ये एक परीक्षा घेण्याचे ठरविण्यात आले. १८६४ साली सत्येंद्रनाथ टॅगोर हा बंगाली विद्यार्थी ही स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होणारा पहिला भारतीय ठरला. १८७० सालच्या एका कायद्यानुसार भारतातील सनदी सेवेत परीक्षा न देता देखील एकूण पदांच्या एक पंचमांश भारतीयांची नियुक्ती करारपत्रीत सनदीसेवेत करण्याचे ठरविण्यात आले. परंतु याबाबतचे इत्यंभूत नियम बनविण्यास ब्रिटिश सरकारने दिरंगाई केल्याचे लक्षात येते. लिटन यांनी मात्र करारपत्रीत सनदी मुलकी सेवेची कवाडे भारतीयांसाठी पूर्णतः बंद करून त्यांच्यासाठी वेगळी मुलकी सेवा निर्माण करण्याची सूचना केली. परंतु तत्कालीन भारतमंत्री लॉर्ड क्रॅनब्रुक (Lord Cranbrooke) यांनी ती अमान्य केली. त्यानंतर लिटन यांनी भारतीयांना ब्रिटिश प्रशासनात सामावून घेण्यासाठी वैधानिक मुलकी सेवेचे नियम केले. या नियमांनुसार असे सुचविण्यात आले की, उच्चकुलीन घराण्यांतील व्यक्तिंनाच प्रांतीय गव्हर्नर्सच्या शिफारसींनुसार भारतीयांना मूलकी सेवेत नियुक्त करण्याचे अधिकार असावेत. तसेच सनदी वा करारपत्रित मुलकी सेवेतील अधिकारी व लिटनने भारतीयांसाठी सुचविलेल्या वैधानिक मुलकी सेवेतून नियुक्त करण्यात आलेले अधिकारी यांना समान वागणूक व दर्जा नसावा असे देखील लिटन यांना अभिप्रेत होते. लिटन साहेबांचे हे नियम भारतीयांमध्ये कमालीचे अप्रिय ठरले व त्यामुळे त्यांनी भारतीयांसाठी सुचविलेली ही अजब मुलकी सेवा अवघ्या आठ वर्षांनंतरच बंद करावी लागली. करारपत्रित मुलकी सेवेत प्रवेश करणे जवळ जवळ अशक्य व्हावे या हेतूने भारतीय करारपत्रीत सनदी सेवेच्या परीक्षेला म्हणजेच आय.सी.एस. परीक्षेला बसण्याचे वय भारतीयांसाठी २१ वरून १९ वर आणण्यात आले. यामुळे भारतीय उच्च शिक्षित व उदारमतवादी तरुणांचा भ्रमनिरास झाला. यातूनच सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी भारताच्या विविध भागांचा दौरा करून याविरोधात रान पेटवून दिले व भारतीयांना या मुद्द्यांवरून संघटीत करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. लिटन यांच्या या सर्व वादग्रस्त वागण्यामुळे व निर्णयांमुळे त्यांनी भारतीयांच्या व प्रामुख्याने उच्चशिक्षित भारतीयांच्या मनात ब्रिटिश राजवटीविरूद्ध रोष व असंतोष निर्माण करण्याचे काम केले असे म्हणणे वावगे ठरू नये.

इंग्लंडचे तत्कालीन पंतप्रधान बेंझामीन डिझराईली यांची इच्छा होती की, इंग्लंडच्या राणीला 'भारताची सम्राज्ञी' -Empress of India वा 'कैसर-ए-हिंद' - Kaiser - I - Hind हा किताब प्रदान करावा. त्यामुळे ब्रिटनच्या संसदेमध्ये त्या स्वरूपाचे विधेयक मांडले गेले व ते बहुमताने पास झाले व त्याचे रॉयल टायटल्स् ॲक्ट, १८७६-Royal Titles Act, 1876 या कायद्यामध्ये रूपांतर झाले व याच कायद्यानुसार ब्रिटनच्या सरकारने इंग्लंडची तत्कालीन राणी व्हिक्टोरिया हिला 'भारताची सम्राज्ञी' असे घोषीत केले. लिटनने भारतामध्ये याची घोषणा करण्यासाठी १ जानेवारी १८७७ रोजी दिल्लीमध्ये एका भव्य दरबाराचे आयोजन केले. हा दरबार आयोजित करण्यासाठी अमाप खर्च करण्यात आला. त्यामुळे भारतीयांच्या मनात असंतोष निर्माण झाला. कारण तेव्हा भारतातील बराचसा भाग दुष्काळाने होरपळून निघाला होता. या दुष्काळाचा उल्लेख आपण अगोदर केलेलाच आहे. भारतीयांना या गोष्टीचा फार राग

आला की, सरकार दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी हात आखडता घेत आहे. मात्र, दिल्ली दरबारावर सढळ हस्ते पाण्यासारखा पैसा खर्च करत आहे, नव्हे उधळत आहे. यातून लिटन साहेबांचा भारतीयांच्या प्रती सहानूभूती शून्य दृष्टीकोन होता असे प्रतीत होते. ब्रिटनच्या राणीला भारताचा सम्राट घोषीत करण्यासंबंधीचे विधेयक जेव्हा संसदेत मांडले गेले तेव्हा इंग्लंडमधील लिबरल पक्षाच्या मंडळींनी त्याचा उपहास केला होता. भारतातील लोकांनादेखील व प्रामुख्याने सुशिक्षित बुद्धीवादी तरुणांना लिटनचे हे कृत्य अजिबात रुचले नव्हते.

लिटन यांनी १८७८ साली देशी भाषिक वृत्तपत्रांवर म्हणजेच भारताच्या विविध भागांतून प्रादेशिक भाषांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांवर निर्बंध लावले. त्यांच्या या निर्णयामुळे साहजिकच भारतातील तरुण सुशिक्षित मंडळी व प्रादेशिक भाषांतून लिहिणारे पत्रकार, संपादक व ही पत्रे छापून प्रसिद्ध करणारे प्रकाशक प्रक्षुब्ध झाले. १८७० च्या दशकापर्यंत बंगाली, मराठी, गुजराथी इत्यादी भारतीय भाषांमधून वृत्तपत्रे निघण्यास सुरुवात झाली होती. ही पत्रे भारतीय लोक प्रसिद्ध करत असल्यामुळे ब्रिटिश नीतींमुळे व धोरणांमुळे भारतीयांवर अन्याय झाल्यावर व सरकार एखाद्या गोष्टीच्या बाबतीत अपयशी ठरल्यावर, तसेच सरकारच्या चुकीच्या निर्णयांवर ही पत्रे टीकेची छोड उठवीत असत. आपण पाहिलेच आहे की, लिटन यांच्या काळात दुष्काळ निवारणासाठी सरकारतर्फे जे प्रयत्न झाले त्यावर भारतीय जनता समाधानी नव्हती. देशी भाषांमधील वृत्तपत्रांनी देखील लिटन व एकंदरीतच ब्रिटिश शासनावर याबाबतीत टीका केली. तसेच लिटन साहेबांच्या दिल्ली दरबार भरविण्याच्या उपद्व्यापावर देखील देशीभाषिक वृत्तपत्रांनी टीका केली होती. लिटन यांचे अफगाणिस्तान बाबतचे धोरणसुद्धा टीकेचे धनी झाले होते. देशीभाषिक वृत्तपत्रांच्या टीकेमुळे लिटन साहेब पुरते रागावलेले होते यात वाद नाही. त्यामुळेच लॉर्ड लिटन यांनी देशीभाषिक वृत्तपत्रांवर निर्बंध लादण्याचे ठरविले, नव्हे त्यांची मुस्कटदाबी करण्याचे ठरविले असे म्हणणे म्हणजे अतिशयोक्ती ठरू नये. याची परिणती म्हणजे मार्च १८७८ चा देशीभाषिक वृत्तपत्रे कायदा (Vernacular Press Act-1878) होय. लिटनच्या या निर्णयाला त्याच्याच म्हणजे गव्हर्नर-जनरलच्या कार्यकारी मंडळातील काही सदस्यांचा विरोध होता, मात्र त्यांनी केलेला युक्तिवाद व व्यक्त केलेली मते यांना धाब्यावर बसवून लिटन यांनी देशीभाषिक वृत्तपत्रे कायदा केलाच. या कायद्यानुसार जिल्हा मॅजिस्ट्रेट (जिल्हा दंडाधिकारी) तसेच पोलिस कमीशनरसारख्या अधिकाऱ्यांना देशीभाषिक वृत्तपत्रांच्या प्रकाशकांकडून व मुद्रकांकडून ते सरकारी धोरणांवर टीका करणार नाहीत अशा प्रकारची हमी लेखी स्वरूपात घेण्याचा अधिकार देण्यात आला. त्याचप्रमाणे दिलेला शब्द पाळावा (भारतीय प्रकाशक व मुद्रकांनी) म्हणून त्यांनी एक विशिष्ट रक्कम अनामत म्हणून या ब्रिटिश अधिकाऱ्यांकडे जमा करावी, तसेच वृत्तपत्रात जे छापले जाईल तो मजकूर अगोदर सरकारी अधिकाऱ्यांना तपासण्यासाठी द्यावा असेदेखील बंधन टाकण्यात आले. एखाद्या वृत्तपत्राने एवढे करूनही जर सरकारवर टीका करण्याचे धारिष्टय़ केले तर त्या वृत्तपत्राच्या मुद्रणालयातील (Press) यंत्रसामुग्री, इतर सामान व वृत्तपत्राच्या प्रती जप्त करण्याचे अधिकार या कायद्यान्वये सरकारी अधिकाऱ्यांना देण्यात आले. तसेच सरकारच्या वृत्तपत्र स्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या या धोरणाविरुद्ध देशीभाषिक वृत्तपत्रांचे मुद्रक, मालक व संपादक न्यायालयात दादसुद्धा मागू शकत नव्हते. या कायद्यामुळे भारतीय पत्रकार व सुशिक्षित मंडळींमध्ये लिटन साहेबांच्याविषयी राग निर्माण झाला यात नवल न मानावे. येथे एक मुद्दा स्पष्ट करणे महत्त्वाचे आहे व तो असा की, लिटन साहेबांनी हे सर्व निर्बंध भारतीय

मनाला ताकद येते ती श्रमाने, विश्रांतीने नव्हे. - पोप

भाषांतून प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांवरच लादले होते. इंग्रजीतून प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांना यातून वगळले होते. याचे एक अतिशय महत्त्वाचे कारण म्हणजे, बहुतांश, नव्हे किंबहुना सर्व इंग्रजी वृत्तपत्रे सरकारवर टीका करण्याचे टाळत असत व सरकारचे लांगूलचालन करत असत. त्यामुळे लिटन यांनी चुकीच्या सरकारी धोरणांवर टीका करणाऱ्या देशीभाषिक वृत्तपत्रांना आपले 'भक्ष्य' बनविले व इंग्रजी वृत्तपत्रांना या कायद्यातून वगळले. त्यामुळे अगोदर म्हटल्याप्रमाणे भारतीय सुशिक्षित मंडळींनी या कायद्यावर टीकेचा भडिमार केला. यात सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी या कायद्याची संभावना इंग्रजीमध्ये 'a bolt from the blue' म्हणजेच 'आकस्मिकपणे घडलेली अनपेक्षीत घटना' असा केला. तसेच इंग्रजीत या कायद्याला 'Gagging Act' म्हणजेच मुस्कटदाबी करणारा वा तोंडात बोळा कोंबणारा कायदा असे म्हटले गेले. भारतीयांनी देखील लिटन यांच्या या कृत्याला अतिशय सुरेख व चाणाक्षपणे उत्तर दिले. उदाहरणच द्यावयाचे तर, 'अमृत बाजार पत्रिका' हे बंगालीतून प्रसिद्ध होणारे वृत्तपत्र लागलीच इंग्रजीत प्रसिद्ध होऊ लागले. लिटन साहेबांवर त्यांचीच चाल उलटविण्याचा हा अतिशय बुद्धिवान व चलाख प्रयत्न होता. कारण लिटन साहेबांची इच्छा असून देखील ते या पत्रावर बंदी लादू शकत नव्हते. कारण तांत्रिक दृष्ट्या हे पत्र इंग्रजीतून प्रसिद्ध होत होते.

लिटन यांनी जॉन स्ट्रॅची यांची १८७६ मध्ये गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळात वित्त सदस्य म्हणून नियुक्ती केली. त्यापूर्वी स्ट्रॅची वायव्य सरहद्द प्रांताचे (North-West Frontier Province) लेफ्टनंट गव्हर्नर होते. स्ट्रॅची यांच्या सुचनांनुसार लिटनच्या काळात वित्तक्षेत्रात सरकारला उपयोगी पडतील असे बदल करण्यात आले. अशाच एका बदलांपैकी महत्त्वाचा वित्तीय बदल वा निर्णय म्हणजे प्रांतांना (Provinces) वित्तीय क्षेत्रात ज्यादा प्रमाणात देण्यात आलेले अधिकार होत. तसे पाहता वित्तीय विकेंद्रीकरणाची सुरुवात लॉर्ड मेयो (हे १८६९-१८७२ या कालावधीत भारताचे गव्हर्नर-जनरल होते) यांनी केली होती. मेयो यांनी काही खाती केंद्रीय प्रशासनाकडून प्रांतीय प्रशासनांकडे हस्तांतरीत केली होती. तसेच प्रांतीय सरकारांना वार्षिक खर्चाकरिता काही रक्कम देऊन ती खर्च करण्याचे अधिकारदेखील त्यांना दिले होते. मेयोने सुरू केलेले हे वित्तीय विकेंद्रीकरणाचे धोरण लिटनने एक पाऊल पुढे नेले. १८७७ साली म्हणजेच लिटनच्या काळात इतर काही खातीदेखील प्रांतीय सरकारांकडे देण्यात आली. यात न्याय व शेतसारा यांचादेखील समावेश होता. प्रांतांना काही कर गोळा करण्याचे वा वसूल करण्याचे देखील अधिकार देण्यात आले. अशाप्रकारे लिटनने प्रांतीय सरकारांना वित्तीय बाबतीत मोठ्या प्रमाणात अधिकार दिले यात वाद नाही. लिटनच्या काळातील अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतात विविध भागांत मिठाच्या करातील असलेली तफावत दूर करण्यात आली. पूर्वी वेगवेगळ्या प्रांतांत मिठावरील करात तफावत असल्याने मिठाच्या चोरट्या व्यापारात वाढ झाली होती. मात्र, आता सर्वत्र जवळ जवळ सारखा वा सामन कर असल्याने अशा व्यापारावर आळा बसला.

लिटन यांच्या वैयक्तिक जीवनाबद्दल सांगावयाचे झाले तर, त्यांचा विवाह ४ ऑक्टोबर १८६४ रोजी एडिथ विलियर्स (Edith Villiers) यांच्यासोबत झाला होता. लिटन दाम्पत्याला एकूण सहा अपत्ये होती व त्यांची नावे पुढीप्रमाणे होती - लेडी एलिझाबेथ एडिथ 'बेट्टी' बुलवर लिटन, लेडी कॉन्सटन्स जॉर्जीना बुलवर लिटन, हेन्री मेरेडीथ एडवर्ड बुलवर लिटन, लेडी एमिली बुलवर लिटन, व्हिक्टर बुलवर लिटन, नेव्हील बुलवर लिटन. यापैकी लेडी एलिझाबेथ एडिथ 'बेट्टी' बुलवर लिटन यांचा विवाह जेरॉल्ड बाल्फर यांच्याशी झालेला होता. जेरॉल्ड बाल्फर हे आर्थर बाल्फर यांचे बंधू

मन नसलेली शरीरे म्हणजे बाजारातले पुतळेच. - युरिपाईडस

होते. आर्थर बाल्फर हे १२ जुलै १९०२ ते ४ डिसेंबर १९०५ या कालावधीत ब्रिटनचे पंतप्रधान होते. ते ब्रिटनमधील हुजूर पक्षाशी निगडित होते. पहिले महायुद्ध सुरू असताना 'ज्यू'च्या वेगळ्या राष्ट्रानिमित्त ब्रिटनने 'ज्यू' नेत्यांना २ नोव्हेंबर १९१७ रोजी जे आश्वासन दिले होते ते इतिहासात 'बाल्फर डिक्लेरेशन' (Balfour Declaration) या नावाने प्रसिद्ध आहे. हे बाल्फर डिक्लेरेशन बनविण्यात आर्थर बाल्फर यांचा सिंहाचा वाटा होता. आर्थर बाल्फर हे १० डिसेंबर १९१६ ते ०३ ऑक्टोबर १९१९ या कालावधीत ब्रिटनचे परराष्ट्र मंत्री होते. असो. लिटन यांची कन्या लेडी एमिली बुलवर लिटन यांचा विवाह ब्रिटनचे जगप्रसिद्ध वास्तुविशारद सर एडविन लँडसीर ल्यूटन्स (Sir Edwin Landseer Lutyens) यांच्याशी झालेला होता. सर ल्यूटन्स यांचा येथे उल्लेख करण्याचे विशेष कारण म्हणजे ब्रिटिशांनी जेव्हा कलकत्त्याहून दिल्लीला आपली राजधानी हलविण्याचे ठरविले तेव्हा सर ल्यूटन्स यांनी नवी दिल्ली शहरातील अतिमहत्त्वाच्या इमारतींची वास्तुरचना केली होती. त्यांनी नवी दिल्लीतील इंडिया गेट, राष्ट्रपती भवन (स्वातंत्र्यापूर्वी ही वास्तू म्हणजे भारताच्या गव्हर्नर-जनरल वा व्हाईसरॉयचे निवासस्थान होते.) या जगप्रसिद्ध वास्तूची रचना केली होती. तसेच त्यांनी नवी दिल्लीत जवळ जवळ २६ चौरस किलोमीटर एवढ्या परिसरात सरकारी अधिकाऱ्यांसाठीच्या निवासस्थानांची रचना केली होती. हा परिसर 'ल्यूटन्स बंगलो झोन' म्हणून प्रसिद्ध आहे. स्वातंत्र्यानंतर अर्थात भारत सरकारच्या प्रशासनातील उच्च पदस्थ अधिकारी व मंत्र्यांसाठीच्या निवासस्थानांची सोय येथे करण्यात आली आहे. ल्यूटन्स यांच्या देखरेखीखाली नवी दिल्ली शहराचा हा जो वास्तू आराखडा बनवला गेला त्यावरून या परिसरास 'ल्यूटन्स दिल्ली' असे देखील म्हणतात. भारताच्या पंतप्रधानांचा बंगला 'ल्यूटन्स दिल्ली' या परिसरातच येतो. अर्थात, सध्याच्या जनकल्याण मार्गावरील 'पंचवटी' बंगल्यात राहायला जाणारे पहिले पंतप्रधान राजीव गांधी हे होते. यापूर्वी इंदिरा गांधी यांचा बंगला एक सफदरजंग (१ सफदरजंग) मार्गावर होता व स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु 'तीनमूर्ती' बंगल्यात राहत असत. नेहरुंच्या निधनानंतर 'तीनमूर्ती' बंगल्याचे वास्तुसंग्रहालयात रुपांतर करण्यात आले. स्वातंत्र्यापूर्वी 'तीनमूर्ती' बंगल्यात ब्रिटिशकालीन भारताचे 'सरसेनाप्रमुख' (कमांडर-इन-चीफ) राहत असत. सर ल्यूटन्स यांनी नवी दिल्लीतील 'हैदराबाद हाऊस' या इमारतीची देखील रचना केलेली होती. ही इमारत म्हणजे हैदराबाद संस्थानचा शेवटचा निझाम, मिर उस्मान अली खान याचे नवी दिल्लीतील निवासस्थान होते. सध्या भारत सरकार 'हैदराबाद हाऊसचा' वापर भारताच्या दौऱ्यावर असणाऱ्या परदेशी पाहुण्यांचे स्वागत करण्यासाठी व त्यांना मेजवानी देण्यासाठी करते. असो.

१८५८ नंतर (राणीच्या जाहीनाम्यानंतर) जरी भारतीयांना देखील कर करारपत्रात मुलकी सेवेतील दारे खुली आहेत असे ब्रिटिश शासनातर्फे वारंवार म्हटले जात असले तरी प्रत्यक्षात भारतीयांची संख्या मुलकी सेवेतील उच्चपदांवर दिसत नव्हती. भारतीय मुलकी सेवेत उच्च पदे मिळविण्यासाठी भारतीयांना इंग्लंडला जाऊन 'इंडियन सिव्हील सर्व्हिस' (Indian Civil Services) ही परीक्षा द्यावी लागत असे. परंतु भारतातून हजारो मैल दूर इंग्लंडला जाऊन ही परीक्षा देणे अनेक भारतीय तरुणांना शक्य नसे वा इंग्लंडला जाणे फार कठीण असे. त्यातल्या त्यात इंग्लंडला जाण्याचा खर्च फक्त श्रीमंत भारतीयांना झेपू शकत होता. साधारण कुटुंबातील विद्यार्थ्यांना नव्हे. याचाच अर्थ, भारतीय विद्यार्थी कितीही कुशाग्र बुद्धीमत्तेचा व होतकरू असला व त्याची इच्छा 'इंडियन सिव्हील सर्व्हिस' परीक्षेस बसण्याची असली तरी तो आर्थिक परिस्थितीमुळे

इंग्लंडला जाऊ शकत नव्हता. त्यामुळेच भारतीय सुशिक्षितांची अशी मागणी होती की, ही परीक्षा भारतातदेखील घेतली जावी. १८६१ साली तर ब्रिटिशांनी आय.सी.एस. परीक्षेला बसावयाचे वय २२ वरून २१ वर्षांवर आणून कहरच केला. १८७९ साली लिटन साहेबांनी भारतीयांना सनदी मुलकी सेवेत सामावून घेण्याचे नियम बनविले. या नियमांनुसार काही उच्च घराण्यातील व उच्च कुळातील लोकांचीच प्रांतीय गव्हर्नरांच्या संमतीने मुलकी सेवेत भरती वा नियुक्ती करण्यात यावी असे ठरविण्यात आले होते. हा प्रकार सरळसरळपणे सामान्य कुटुंबातील सुशिक्षित तरुणांना सनदी सेवेपासून हेतुपुरस्कर दूर ठेवण्याचा होता. यातच लंडनमध्ये होणाऱ्या आय.सी.एस. परीक्षेची वयोमर्यादा २१ वरून १९ वर्षांवर आणण्यात आली. हे सर्व विवेचन आपण अगोदर केलेलेच आहे. यामुळे लिटन साहेबांच्या फक्त उच्चकुलीन कुटुंबांतील व्यक्तींनाच मुलकी सेवेत संधी देण्याच्या निर्णयामुळे नाराज झालेला तरुण भारतीयांचा सुशिक्षित वर्ग आय.सी.एस्. परीक्षेची वयोमर्यादा १९ वर्षांवर आणल्यावर अजूनच रागावला. यातूनच भारतीय सुशिक्षीत मंडळींनी भारतीय सनदी मुलकी सेवेत भारतीयांना समानतेच्या तत्त्वावर संधी दिल्या पाहिजेत या मुद्द्यावर भारतभर आंदोलन उभे राहिले व या आंदोलनाचे प्रणेते सुरेंद्रनाथ बॅनर्जी होते. सुरेंद्रनाथांवर तर ब्रिटिशांनी फारच अन्याय केलेला होता. सुरेंद्रनाथांनी आय.सी.एस. परीक्षा उत्तीर्ण केलेली होती. परंतु एक तर ब्रिटिश सरकारने त्यांना नियुक्ती देण्यात दिरंगाई केलेली होती व त्यानंतर वरीष्ठांशी चांगली वर्तणूक नसल्याचे कारण देऊन त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. सुरेंद्रनाथांनी मुलकी सेवेबाबत लिटन साहेबांनी व एकंदरीतच ब्रिटिश शासनाने जो घोळ घातला होता त्याविरोधात भारताच्या विविध भागांचा दौरा करून रान उठवून दिले व जनतेमध्ये जागरुकता निर्माण केली. तसेच इंडियन असोसिएशन या बंगालमधील राजकीय स्वरूपाच्या संघटनेकडून लाल मोहन घोष यांना मुलकी दाव्याबाबतची सुशिक्षित भारतीयांची कैफीयत ब्रिटिश संसदेसमोर मांडण्यासाठी लंडनला पाठविण्यात आले होते.

लॉर्ड लिटन यांची १८७६ सुरू झालेली भारताच्या 'व्हाईसरॉय' पदाची कारकीर्द १८८० मध्ये संपुष्टात आली. लॉर्ड लिटन यांची भारतातील कारकीर्द फार वादळी व वादग्रस्त ठरली. याबाबतचे विवेचन आपण अगोदर केलेलेच आहे. लिटन हे साम्राज्यवादाचे समर्थक होते व त्यांना कुठल्याही परिस्थितीत ब्रिटिशांची भारतावरील पकड मजबूत करावयाची होती. नेमक्या याच भावनेतून लिटन यांनी आपल्या 'व्हाईसरॉय' पदाच्या काळात घेतलेले विविध निर्णय प्रभावीत झालेले होते. त्यांचा दृष्टिकोन इंग्लंडला आर्थिकदृष्ट्या सबळ वा सदृढ करावयाचा होता. मग त्यासाठी भारताचे आर्थिक नुकसान झाले तरी ते त्यांना चालणार होते. याच धोरणाचा एक भाग म्हणून त्यांनी इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या विविध वस्तूंचा आयात कर रद्द केलेला होता. लिटन यांचे अफगाण धोरण एवढे वादग्रस्त ठरले की, त्याचे पडसाद ब्रिटनच्या अंतर्गत राजकारणावर देखील पडले. १८८० साली इंग्लंडमध्ये ज्या सार्वत्रिक निवडणूका झाल्या त्यात ग्लॅडस्टन यांच्या नेतृत्वाखाली लिबरल पक्षाचा विजय झाला व हुजूर पक्षाला हार पत्करावी लागली. त्यामुळे हुजूर पक्षाचे संसदेतील नेते व १८७४ (२० फेब्रुवारी) ते १८८० (२१ एप्रिल) या काळात इंग्लंडचे पंतप्रधान पद भूषविणाऱ्या बेंजामीन डिझराईली (फर्स्ट अर्ल ऑफ बिकन्सफिल्ड) यांना आपले पंतप्रधानपद गमवावे लागले. याच डिझराईली यांनी लिटन यांची भारताचे व्हाईसरॉय म्हणून नियुक्ती केली होती व त्यांच्या धोरणांना आशीर्वाद दिलेला होता. अर्थात यात लिटन यांच्या अफगाण धोरणाचा देखील समावेश होता. लिटन यांच्या बाबतीत अजून एक गोष्ट नमूद

करावी लागेल व ती ही की, त्यांनी भारताच्या अंतर्गत दळणवळणाच्या व वाहतुकीच्या क्षेत्रात प्रगती व्हावी यासाठी पाठिंबा दिला व प्रामुख्याने भारतात लोहमार्गांचे जाळे अजून जास्त प्रमाणात पसरावे व रेल्वेची प्रगती व्हावी ही त्यांची भूमिका होती. इंग्लंडला परतल्यानंतर लिटन यांची १८८७ साली पॅरिसमध्ये इंग्लंडचे राजदूत म्हणून नियुक्ती झाली होती. ते १८८७ ते १८९१ या काळात पॅरीसमध्ये राजदूत म्हणून काम करत होते. २४ नोव्हेंबर १८९१ रोजी लिटन यांचे पॅरिस येथे निधन झाले. तत्कालीन फ्रेंच सरकारने लिटन यांच्या पार्थिवाला शाही इतमामात तोफांची मानवंदना दिली व त्यांचे पार्थिव इंग्लंडमध्ये नेबवर्थ पार्क (Knebworth Park) येथे दफन विधीसाठी धाडण्यात आले.

**संदर्भ :**

अ न्यू लूक अॅट मॉडर्न इंडियन हिस्ट्री : बी. एल्. गोव्हर, अलका मेहता

गव्हर्नर्स-जनरल अँड व्हाईसरॉयीज् ऑफ इंडिया : एस्. आर. बक्षी

हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया : अ डिटेल्ड स्टडी ऑफ पोलीटिकल, इकॉनॉमीक, सोशियल अँड कल्चरल आसपेक्टस् : एस्. सी. रेचौधरी

आधुनिक भारताचा इतिहास (१८५७ ते १९२७) : डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर

ऑक्सफर्ड डिक्शनरी ऑफ नॅशनल बायोग्राफीज्

**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

●●●

(पृष्ठ क्र.५ वरून- **शास्त्रवेध-०९: ऊर्जेच्या एककांची कथा**)

स्वामित्व, जीवास सामर्थ्य देते. 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे असा सर्व भूमंडळी कोण आहे' हे आपल्याला माहीतच आहे. सामर्थ्याची साधना म्हणजेच ऊर्जेची आराधना आणि ती करायची तर तिची एकके माहीत असायलाच हवीत. त्यांचीच तर ही प्रसूति आहे.

**ऊर्जा**

बटण दाबता पंखे फिरती । दिवे लागती, ट्यूब उजळती।।
ऊर्जा त्यांना मिळते कैसी। आले का कधी तुम्हा मानसी?।।१।।
तारांतुनी ते वीज मिळविती । क्षणी पेटती, क्षणात विझती।।
तारा तरी ती कुठुनी आणती। ऊर्जा त्यांच्यासाठी इतुकी?।।२।।
तारा, ऊर्जा-संयंत्रातुनी । तिला आपल्या घरी आणती ।।
संयंत्रात, तरी ती कोठुनी। येई ऊर्जा, की जादूतुनी?।।३।।
जळते इंधन संयंत्रांतुनी । ऊर्जा त्याची तिथे बदलुनी ।।
तिचे रुपांतर विजेत घडुनी । वीज होऊनी, ती ये तिथुनी ।।४।।
वाटे ऊर्जा मिळते सहजी। नसे जगी या, तसे कधीही।।
कुठे कष्टल्या विना कुणीतरी। कुणा कधी का, सुखे लाभती?।।५।।

**संदर्भ:**

एनर्जी-२०००: ऍन ओव्हर व्ह्यू ऑफ द वर्ल्ड एनर्जी रिसोर्सेस इन द डिकेडस टु कम, हेंझ नोप्फेल, युराटोम व युरोपिअन अणुऊर्जा अडत यांच्या संयुक्त विद्यमाने, पृष्ठे:१८१, ऊर्जा संशोधन केंद्र, फ्रास्काटी (रोम), गॉर्डन आणि ब्रिच विज्ञान प्रकाशन, १९८६.

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

पहिला खिळा घट्ट ठोकल्याशिवाय दुसरा मारू नका. - टी. फलर

# झाडांना आपल्याबद्दल काय वाटतं ?

*उत्तनच्या रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत सर्जनशील लेखनावर झालेल्या कार्यशाळेचा ज्येष्ठ पत्रकार आरती कुलकर्णी यांचा लेख - संपादक*

उत्तनच्या रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या आवारात बहरलेलं एक गुलाबी कांचनाचं झाड. एका प्रसन्न सकाळी ते गुलाबी पाकळ्यांचा वर्षाव करतंय. त्याच्या पायतळीची जमीन पाकळ्यांनी भरून गेली आहे. गुलाबी झाली आहे.... झाडाखाली उभं राहून त्याचा बहर अनुभवण्याचा असा क्षण क्वचितच येतो.. नाही?

माझ्या एका चित्रकार मित्रानं अशाच लालभडक पाकळ्यांचा वर्षाव करणाऱ्या गुलमोहोराची फार सुंदर चित्रं काढली आहेत. आज ते चित्र या कांचनाच्या झाडानं माझ्यासाठी निराळ्या रंगात काढलं होतं.

झाडावर उन्मुक्तपणे फुललेल्या त्या फुलांचा रंग नेमका कसा होता? गुलाबी... फिक्कट जांभळा... ताम्हणीच्या फुलांसारखा...? की गुलबक्षी ? कांचनाचं झाड म्हणत होतं... रंगुनी रंगात साऱ्या, रंग माझा वेगळा!

वेगळ्या रंगासारखाच वेगळाच मंद गंधही होता त्या झाडाला... हातात गोळा केलेल्या त्या पाकळ्या मी अलवारपणे झाडाच्या तळाशी पसरल्या आणि उगवत्या सूर्याच्या दिशेनं, झाडांमधून वळणं घेत जाणाऱ्या झोकदार रस्त्यानं आणखी फुलांच्या ताटव्याजवळ गेले. चाफा, बिट्टी, कुमकुमकेशराची फुलं कोवळ्या सूर्यप्रकाशात न्हात होती.

त्यांच्यावर एखादं फुलपाखरू भिरभिरायला थोडासा वेळ होता अजून. पण बहरलेल्या झाडांवरून गाजावाजा करत उडणाऱ्या पोपटांनी मात्र सकाळची घाईगर्दी सुरू केली होती. त्यांच्यामुळे कळलं... इथलं सूर्यप्रकाशात चमकणारं सोनेरी आकाश किती खुलंखुलं होतं...

समोरच्या टेकडीवर खास उत्तर कोकणातलं झाडाझुडपांचं, उंचाड्या ताडांचं जंगल. याच टेकडीच्या पायथ्याशी या प्रबोधिनीचा कॅंम्पस. सकारात्मक हवेचा... चैतन्याचा. म्हणूनच पर्यावरणावर सृजनात्मक लेखन करणाऱ्या माणसांचा मेळा इथे भरला होता.

ही अशी झाडाला नुकत्याच फुटलेल्या पालवीसारखी हिरवीगार आयडिया 'एन्व्हायरोव्हिजिल' या संस्थेचे विद्याधर वालावलकर यांची. पर्यावरणावर आपण केलेलं सृजनात्मक लिखाण मांडायचं, या क्षेत्रातल्या लेखकांशी संवाद साधायचा, पर्यावरणात काम करणाऱ्या झपाटलेल्या व्यक्तींना भेटायचं ही संकल्पनाच नवी होती.

पण म्हणजे काय करायचं ? चैतन्यानं भारलेल्या त्या सकाळी झाडांमधून चालताना मला उत्तर मिळालं होतं. असंच तर करायचं होतं दोन दिवस. आपल्या झाडाकडे निरखून बघायचं, फुलांकडून फुलणं घ्यायचं, पक्ष्यांसोबत उडणं शिकायचं... आपल्याला झाडांबद्दल काय वाटतं हे तर सांगायचंच, पण झाडांना आपल्याबद्दल काय वाटतं हे समजून घ्यायचं !

वर्कशॉपमधल्या एका सेशनमध्ये झाडं, फुलं, पक्षी, यांच्यावर केलेल्या काही अजरामर कवितांचं सुलेखन आणि चित्रं दाखवत प्रशांत धर्माधिकारी म्हणाले... हे पानगळीचं झाड आणि त्याच्यासाठी लिहिलेली ही कविता पाहून तुम्हाला काय वाटतं सांगा पाहू ?

A leaf falls in loneliness !

---

ईश्वराचे नाव एखाद्या बलिष्ठ बुरुजासारखे समर्थ असते. - जुना करार

कुणी म्हणालं... हे झाड एकाकी आहे... बहर सरून गेलाय... पानं गळतायत. कुणाला वाटलं...हे झाड आपल्यासारखं आहे. कुणाला वाटलं... हे दु:खाचं प्रतीक आहे. प्रत्येक जण आपल्या मनातल्या भावना त्याला लावून बघत होतं.

प्रशांत धर्माधिकारी सर म्हणाले.. 'पान गळताना आपल्याला कुणीच पाहिलं नाही, असं त्या झाडाला आणि पानाला वाटतं आहे ! आपण निसर्गाकडे, पर्यावरणाकडे आपल्या दृष्टीनं पाहतो पण निसर्गाला काही सांगायचं आहे, ते आपण कधी ऐकणार?'

त्यांना विल्यम वर्ड्सवर्थची 'Daffodils' कविता आठवते, तेवढंच कालिदासाचं मेघदूतही. ते सांगतात, कवी कालिदासाच्या 'शाकुंतल' नाटकातली शकुंतला जेव्हा ऋषींच्या आश्रमातून निघते तेव्हा हरिणींचा घास अडतो, वेली माना टाकतात. एक निसर्गकन्या आपल्याला सोडून चालली आहे हा क्षण त्यांना दु:खी करतो. कालिदास शकुंतलेच्या मनाचा विचार करतो; तेवढाच तो तिच्या भोवतीच्या निसर्गाबद्दल संवेदनशील आहे.

यालाच म्हणतात, मानवकेंद्रित विचाराकडून निसर्गकेंद्रित विचाराकडे जाणं. संत ज्ञानेश्वरांचा पर्यावरण विचार, 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' हे तुकारामांचं सांगणं हेच तर आहे.

'एक होता कार्व्हर' च्या लेखिका वीणा गवाणकर यांच्याशी झालेल्या संवादामध्ये हाच धागा थोड्या निराळ्या पद्धतीनं गुंफलेला. कार्व्हर कसा घडला, हे पुस्तक कसं सुचलं, ते अजूनही किती प्रेरणा देतं यावर तर त्या बोलल्याच; पण वालावलकर सरांनी या पुस्तकातले काही परिच्छेद वाचून दाखवले आणि आम्ही सगळेच जण कार्व्हरच्या भोवती असलेल्या पर्यावरणात गेलो.

त्या म्हणाल्या, पक्षीतज्ज्ञ डॉ. सालिम अलींवर मी जेव्हा पुस्तक लिहिलं तेव्हा त्यांच्याकडे मी पक्ष्यांमध्ये गढलेला माणूस म्हणून तर पाहिलंच पण पक्ष्यांच्या नजरेतून जास्त पाहिलं आणि या पुस्तकाचं कव्हर साकारलं. डॉ. सालिम अली एका फांदीवर पक्ष्याच्याच रुपात बसले आहेत. त्यांचं नाक पक्ष्याच्या चोचीसारखं बाकदार आहे आणि त्यांच्या हातात दुर्बीण आहे !

या पुस्तकातल्या एका व्यंगचित्रात त्या पक्ष्यांना कुणीतरी सांगतं...'बाहेरच्या जगात कसं वागायचं याच्यासाठी तुम्ही सालिम अलींचं पुस्तक वाचा'. कारण सालिम अलींनी पक्ष्यांच्या वर्तणुकीचीही छान वर्णनं केली आहेत. वीणाताई या निसर्गकेंद्रित विचारांबद्दल बोलत होत्याच, पण त्यासोबतच निसर्गाबद्दलची, आयुष्याबद्दलची मानवी प्रेरणा काय आहे हेही सांगत होत्या.

सृजनात्मक लिहायचं असेल तर आधी सृजनात्मक वाचायला हवं. त्या म्हणाल्या, मी लेखक आहे, याहीपेक्षा मी वाचक आहे, असं मला वाटतं. मग पुस्तकं असो किंवा माणसं... मी आधी खूप वाचते, हिंडते, अनेकांशी बोलते..आणि मग लिहिते. याच ध्यासानं वीणाताईंनी पाणी परिषदेच्या विलासराव साळुंखेंवर 'भगिरथाचे वारस' हे पुस्तक लिहिलं आणि समन्यायी पाणीवाटपाची संकल्पना गोष्टीरुपानं सांगितली.

वीणाताईंचं ऐकताना वाटत होतं... वाचाल तर वाचाल असं म्हणतात. पण आता म्हटलं पाहिजे... वाचाल तर लिहाल आणि लिहाल तर वाचाल... !

पक्ष्यांशी त्यांच्यासारखी शीळ घालून बोलणारे पक्षीमित्र लेखक किरण पुरंदरे मात्र म्हणतात... निसर्गात हिंडाल तर लिहाल आणि तरच वाचाल. चार भिंतींच्या आत त्यांचं सत्र ऐकण्याच्या आधी त्यांच्यासोबतची सफर म्हणजे तर काय !... त्यांच्यासोबत पक्षी बघायला आपण जमतोच पण सभोवताली नसलेले पक्षीसुद्धा येतात !

---

तेजस्वी नावामुळे गीताला पावित्र्य येते. – बायरन

थोडंसं दूरवरच्या झाडावर तांबटानं कुक् कुक् कुक् असा आवाज लावला होता. किरण पुरंदरेंनी त्याचा आवाज असा सगळीकडून का येतो... ते त्याचा घुमाराचा सूर लावून सांगितलं. त्यांचा आवाज ऐकताच तो अचानक थांबला. त्याला वाटलं, आपल्या हद्दीत आणखी एक स्पर्धक कोण आला बुवा ? मग दयाळ, भारद्वाज, सुभग असे त्यांचे सगळे गायक मित्रही मैफलीत आले.

पक्ष्यांच्या स्लाइड्स दाखवत, त्यांचे आवाज काढत किरण पुरंदरेंनी त्यांच्या आवडत्या पक्ष्यांना पुन्हा बोलावलं. ते सांगत होते...पक्षी आणि झाडं यांच्यातल्या नात्यांवर लेखन झालं पाहिजे. झाडं आहेत म्हणून पक्षी आहेत. पण पक्षी बीजारोपण करतात म्हणून झाडं उगवून येतात हे आपण विसरतोच. वृक्षारोपणाचे पुरस्कार म्हणूनच तर आपल्यापेक्षा पक्ष्यांना द्यायला हवेत !

ते म्हणाले, आदिवासी आणि निसर्ग यांच्यातल्या संबंधांवर शोधनिबंध आहेत पण सहज, सुंदर आणि सोपं लिखाण झालेलं नाही. वाघ, फ्लेमिंगो अशा लोकप्रिय प्राणीपक्ष्यांवर आपण लिहितोच पण फुलपाखरांच्यावर अजून खूप लिहायला हवं.

किरण पुरंदरे सर हे बोलत असताना मला एका दिवाळी अंकासाठी फुलपाखरांचे संशोधक आयझॅक किहीमकर यांच्यावर लिहिलेला लेख आठवला. फुलपाखरांचे रंग, त्यांचे फूड प्लँट्स, स्थलांतर करताना त्यांच्या दिसणाऱ्या रिबिनी यावर मी लिहिलं होतं. ब्लू मॉरमॉन फुलपाखरू पावसात डोंगरावरून खाली येतं, त्याच्या अळीनं विणलेल्या कोषातून आणखी फुलपाखरं बाहेर पडतात. मग ते मरून जातं. पण मग नवी फुलपाखरं पुन्हा परत त्यांच्या मूळ जागी जातात.

आयझॅक किहीमकरांनीच मला पाईड क्रेस्टेड कक्कू म्हणजे चातक पक्ष्याची गोष्ट सांगितली होती. हा पक्षी आफ्रिकेतून आपल्याकडे स्थलांतर करून येतो. हे पक्षी पिल्लांना जन्म देतात आणि मग ते मरून गेल्यावर त्यांची पिल्लं त्यांच्या मूळ जागी आफ्रिकेत एकटीच जातात !

स्थलांतर करून आलेल्या फुलपाखरांची पुढची पिढी, पक्ष्यांची पिल्लं आपल्या आईबापाशिवाय पुन्हा तिथेच कशी जातात ? पक्षीतज्ज्ञ किरण पुरंदरे सांगतात... ही त्यांची उपजत प्रेरणा आहे. तशीच त्यांच्याशी नातं सांधतासांधता निसर्गात रमण्याची उपजत प्रेरणा आपल्यातही आहे.

याच प्रेरणेनं आपण लिहायला हवं आणि लिहिण्यासाठी कमालीची संवेदनक्षमताही हवी. ही कुठे विकत मिळत नाही. पण हो... निसर्गात गेलात, झाडांशी बोललात, पाखरांचे सूर ऐकलेत तर ही संवेदनशीलता तुमच्यातही येते. त्यांना पाडगांवकरांची कविता आठवते..

प्रेम कधी तराजूत तोलू नये
आणि जिथे फुलं फुलतात
तिथे आपण बोलू नये...

खरंच.. आपण जे पाहतो, जे अनुभवतो त्याबद्दल खूप न बोलता.. ते मनात मुरू दिलं तर लिहिता येईल आपल्याला.

हे युग आहे ... सोशल मीडियाचं, व्हायरल व्हिडिओजचं. कमेंट देताना इमोजी टाकायचा आणि काही लिहिलेलं दिसलं की ते टिपून घेण्याऐवजी त्याचा फोटो काढायचा. मग अशा युगात लिहिण्याबद्दल कार्यशाळा घ्यावी, असं वालावलकर सरांना का वाटलं?

ते म्हणतात... 'कितीही वेगवेगळी माध्यमं आली तरी लिहिलेला शब्द वाचणं या कृतीला पर्याय नाही. डिजिटल युगामध्ये माझ्याकडे माहितीचा प्रचंड पूर असतो. पण मी जेव्हा आमचा 'आपलं पर्यावरण'चा अंक लोकांच्या हातात देतो तेव्हा कुणीही पटकन त्यात गढून जातो.'

सत्तेची हाव हा एक अत्यंत प्रबळ विकार आहे. – टॅसिटस

'पर्यावरण क्षेत्रात काम करणारे मान्यवर तज्ज्ञ, लेखक, साहित्यिक हे तर लिहितच असतात पण या क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते, पर्यावरण विषय शिकवणारे शिक्षक, विद्यार्थी या सगळ्यांनीच वाचलं आणि लिहिलं पाहिजे. एवढंच कशाला, आपण सगळ्यांनीच आपले पर्यावरणाबद्दलचे विचार, आपलं निसर्गाशी नातं यावर लिहिलं पाहिजे, असं मला वाटतं. जेव्हा आपण लिहायला लागू तेव्हा पर्यावरण आपल्याला जास्त समजेल आणि विचारांमध्ये स्पष्टता येईल.'

राष्ट्रीय हरित लवादाचे माजी अधिकारी डॉ.अजय देशपांडे याच नॅशनल ग्रीन ट्रिब्युनलच्या कामाबद्दल बोलले. त्यांच्या मते, पर्यावरण रक्षणाचा एखादा खटला लढवताना जर आपली कैफियत लिखाणातून मांडता आली तर न्यायासाठीची दाद प्रभावी होते. मग त्यासाठी निरीक्षण हवं, संशोधन हवं आणि ते मांडण्याची हातोटी हवी. त्यांना आठवतं, मुंबईच्या कोळ्यांनी अशाच पद्धतीने त्यांचा एक प्रश्न मांडला होता. एका प्रकल्पामुळे समुद्राच्या लाटांवर होणारा परिणाम, मच्छिमारीतले धोके याची कहाणीच त्यांनी मांडली होती. आणि आम्हाला त्याची दखल घ्यावी लागली.

डॉ. अजय देशपांडेंनी एका दगडखाणीचं उदाहरण दिलं. या खाणींच्या परिसरात राहणाऱ्या गावकऱ्यांनी आणि प्रदूषणाविरुद्ध लढणाऱ्या कार्यकर्त्यांनी त्यांचा प्रश्न लवादापुढे मांडलाच पण त्यावरचे उपायही सांगितले. खाणीच्या परिसरात राहणाऱ्या लोकांसाठी म्हणून कायद्यात काय तरतुदी आहेत हे त्यांनी लवादाच्या लक्षात आणून दिलं. हे सगळं त्यांनी एखादी गोष्ट सांगितल्यासारखं लिहिलं होतं.

मी आणि माझा पर्यावरण पत्रकार सहकारी भावेश ब्राह्मणकर पर्यावरण पत्रकारितेवर सादरीकरण करत होतो. आमच्या दोघांच्याही बोलण्यात बातमी, पत्रकारिता मूळ असली तरी माझं दिवाळी अंकातलं लिखाण आणि भावेशचं स्तंभलेखन जास्त भावणारं होतं. भावेश प्रींट मीडियामध्ये काम करतो, मी गेली १० वर्षं टीव्हीमध्ये काम केलंय. त्यामुळे माझा प्रींट मीडियातल्या लिखाणाचा प्रवास आठवणं हा माझ्यासाठी वेगळाच अनुभव होता.

या कार्यशाळेला येताना माझ्या मनात मी 'अवनी' वाघिणीवर लिहिलेला दीर्घलेख होता. एक पर्यावरण पत्रकार म्हणून यात सगळ्या गोष्टींची उत्तरं शोधण्याचा मी प्रयत्न केला होता. अवनीला मारावं की मारू नये या वादाचे सगळे कंगोरे तपासले होते. पण त्याहीपेक्षा अवनीसारखे वाघ आणि त्यांच्याशी थेट संबंध आलेल्या माणसांची कहाणीही सांगितली होती.

ही कहाणी लिहिताना मला प्रख्यात दिग्दर्शक अकिरा कुरोसावा यांची आठवण झाली. ते म्हणतात... Truth has many versions. सत्याला अनेक बाजू असतात.

मी अवनीबद्दल लिहिलं होतं... 'आपण प्राणीप्रेमींची बाजू ऐकली, वनविभागाचं म्हणणं ऐकलं, अवनीच्या हल्ल्यात बळी पडलेल्यांच्या कुटुंबीयांची कैफियत ऐकली; पण अवनीचं आणि तिच्या बछड्यांचं म्हणणं आपल्याला कळू शकत नाही. त्यांना प्रेस कॉन्फरन्सही घेता येत नाही की प्रेस रिलीजही काढता येत नाही !'

मी या कहाणीकडे अवनीच्या बाजूने बघितलं होतं हे मला या कार्यशाळेत जाणवलं. पर्यावरणाचं लेखन करताना निसर्गकेंद्रित विचार हवा असं म्हणूनच तर किती खरं आहे.

आम्ही पत्रकार हे बातमी देणारे असतोच पण स्टोरीटेलर असतो. आम्ही सांगतोय ती गोष्टच असते. ती सत्यावर आधारित हवी. पण त्यात क्रिएटिव्ह पद्धत

---

माणसाला मोठेपणा हा जसा स्थानाने येत नाही, तसेच राजदंडाने राजाला येत नाही.
मोठेपणा हा अंगीच असावा लागतो. - इंगरसोल

वापरताच येत नाही असं कशावरून ? 'कासववाले', यांचं रक्तच हिरवं, तृणमेळा, जन्नत ए नाईल अशा माझ्या दीर्घ लेखांमध्ये मी हा प्रयत्न केला आहे. असं लिखाण आपल्यासोबत आणि वाचकांसोबत कायमचं राहतं.

मी बीबीसी न्यूजमध्ये काम करत असताना Creative Journalism च्या सत्रात खूप रमून गेले होते. जाहिरात, जनजागृती मोहिमांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या राधारानी आम्हाला म्हणाल्या, कोणतीही स्टोरी करताना तुम्ही What If ? असा प्रश्न विचारून पाहा. असं झालं तर काय होईल ? याचा विचार करा.

उदाहरणच द्यायचं झालं तर दिल्लीच्या प्रदूषणाचं देता येईल. ही स्टोरी करताना कुणीतरी लिहिलं होतं की, दिल्लीची हवा इतकी प्रदूषित झाली आहे की, तुम्ही रोज ५० सिगरेट्स पिता आहात ! हे धक्कादायक असलं तरी खूपच प्रभावी आहे. ते मांडण्याची पद्धत इतकी क्रिएटीव्ह आहे की तुम्ही ते विसरूच शकत नाही.

नाशिकचा पर्यावरण पत्रकार भावेश ब्राह्मणकरने प्लॅस्टिकच्या प्रदूषणाविरुद्ध लढणाऱ्या बालीमधल्या मुलींची गोष्ट सांगितली. आपल्या किनाऱ्यावर पर्यटकांनी प्लॅस्टिक टाकू नये म्हणून या मुलींनी एअरपोर्टच्या अधिकाऱ्यांना बजावलं, गव्हर्नरच्या कार्यालयाबाहेर उपोषण केलं. शेवटी प्लॅस्टिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी त्या गव्हर्नरने या मुलींसोबत करार केला !

अशीच गोष्ट नंदुरबार जिल्ह्यातल्या आदिवासींची. आपल्या गावाभोवतालच्या जंगलातल्या जैवविविधतेचा त्यांनी अभ्यास केला आणि आमच्या जंगलावर आमची माया आणि मालकी आहे हे पटवून दिलं. त्यांच्या प्रयत्नांतून आता तिथे जैवविविधता केंद्र उभं राहिलं आहे.

पर्यावरणाचे प्रश्न सृजनात्मक रीतीने मांडणं जेवढं महत्त्वाचं तेवढंच त्यावर सृजनात्मक पद्धतीने उपाय काढणाऱ्यांची कहाणी सांगणं हेही महत्त्वाचं आहे. सकारात्मक गोष्टींमध्ये जास्त सृजन आहे आणि त्याला मिळणारा प्रतिसादही मोठा आहे.

हिमनद्या वितळतायत म्हणून लडाखमध्ये कृत्रिम हिमनद्या तयार करणाऱ्या सोनम वांगचूक यांची कहाणी तर किती रोमहर्षक आहे. हवामान बदल, पृथ्वीची तापमानवाढ याला या माणसाने दिलेलं उत्तर एकदम क्रिएटीव्ह आहे !

अगदी लांब कशाला जा... ही कार्यशाळा आयोजित करणारे विद्याधर वालावलकर गेली २० वर्षं घनकचरा व्यवस्थापन, रेनवॉटर हार्वेस्टिंगच्या माध्यमातून काम करतायत. ठाण्याची खाडी स्वच्छ ठेवण्यासाठी ते जे प्रयत्न करतायत त्या प्रयत्नांच्या यशोगाथा अनेक आहेत.

शहरातल्या माणसांनी आपल्या सोसायटीचं पर्यावरण राखायचं ठरवलं तर काय होतं हे सांगणारी ठाण्याच्या विकास सोसायटीची गोष्ट मला नेहमीच प्रेरणा देत आली आहे. हे मी टीव्हीसाठीच्या स्टोरीजमध्ये मांडलं आहेच पण त्यावर वेगळं लिहायला हवं.

या कार्यशाळेत पर्यावरण पत्रकार अभिजीत घोरपडे यांचं 'भवताल'हे नियतकालिक आणि अतुल देऊळगावकर यांच्या ' विनाशवेळा' या लेखाची आठवण झाल्याशिवाय राहिली नाही. पर्यावरणाबद्दलच्या मराठी साहित्यात जसं मारुती चितमपल्ली, व्यंकटेश माडगूळकर, शरदिनी डहाणूकर अशा लेखकांचं मोठं योगदान आहे तसंच पत्रकार, स्तंभलेखक यांचंही.

मी पुण्यात शिकत असताना 'श्रावण' या पर्यावरणाला वाहिलेल्या मासिकाचं काम करत असे. 'वाइल्ड' या संस्थेचे शेखर नान्नजकर हे मासिक चालवत. पर्यावरण

तज्ज्ञ प्रकाश गोळे, निरंजन घाटे, जगदीश गोडबोले सतिश पांडे, कृष्णमेघ कुंटे असे लेखक त्यात लिहायचे. हे सगळं वाचताना, लिहिताना मला निसर्गाबद्दल लिहिण्याची प्रेरणा मिळाली. प्रकाश गोळेंच्या 'कथा कोकण किनाऱ्याची' या पुस्तकामुळे मी भारावून गेले होते.

चिंपांझींवर संशोधन करणाऱ्या जेन गुडाल यांचं 'Among The Shadow of Man' हे असं मनावर कोरलेलं पुस्तक. चिंपांझींच्या संशोधनावर जेन गुडाल यांनी शोधनिबंध लिहिला; पण नंतर या संशोधनाची कहाणी सांगणारं हे स्वतंत्र पुस्तक लिहिलं.

त्या लिहितात... 'मी चिंपाझींच्या मागे खूप महिने फिरले... त्यांच्यासाठी केळ्यांचे घड नेले, त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला. पण ते काही मला ओळख दाखवत नव्हते. पण असंच एक दिवस फिरताफिरता एका चिंपांझीला माझ्याजवळ यावंसं वाटलं. आम्ही शेजारी शेजारी बसलो होतो...मी माझा हात थोडा जवळ नेला...त्यानेही हेच केलं. पुन्हा मी हात आणखी जवळ नेला... त्याने त्याचा हात आणखी जवळ आणला. असं करतकरत आम्ही एकमेकांच्या हातावर हात ठेवला!'

कांगोच्या या जंगलात हा ऐतिहासिक प्रसंग घडला ते चित्रित करायला कॅमेरा नव्हता पण जेन गुडाल यांच्या शब्दांनी तो तसाच्या तसा आपल्यासमोर उभा केला. शब्दांची ताकद ही अशी असते. एखादी घटना निसर्गात एकदाच घडते. पण शब्दांनी, लिहिण्याने ती पुन्हा घडवता येते तशी कॅमेऱ्यासाठी पुन्हा घडत नाही.

या कार्यशाळेत आम्ही आमचे अनुभव सांगतच होतो, पण त्याहीपेक्षा सहभागी झालेल्या हिरव्या माणसांचे अनुभव ऐकण्यासारखे होते. प्रत्येकाकडे सांगण्यासारखी आणि मनाला भिडण्यासारखी एक गोष्ट होती. कुणी टिटवाळ्याचं नाहीसं झालेलं जंगल पुन्हा उभं करण्यासाठी झटत होतं तर कुणी आपल्या अंगणात बाग कशी फुलवावी हे सांगत होतं.

पालघरचे एक पर्यावरणवादी कार्यकर्ते प्रदूषणाविरुद्ध लढत होते तर केमिकल कंपनीत काम करणारे एक जण प्रदूषण कसं कमी करता येईल याचा विचार करत होते. औरंगाबादचा एक तरुण लेखक तिथल्या पर्यावरणाबद्दल मराठी, इंग्रजी, हिंदी अशा भाषांमध्ये लिहिणारा होता. पुण्याहून वनराई मासिक चालवणारे एक जण मासिकं, लेख यांच्या प्रेमापोटी आले होते.

नागपूरचे पतीपत्नी हे सगळं समजून घेण्यासाठी आणि इथे अनुभवलेलं मुलांशी शेअर करण्यासाठी आले होते. कोकणातून आलेल्या एकांना त्यांच्या गावात पक्षी पर्यटन सुरू करायचं होतं. तर एका कलाकार मुलीला निसर्गातून प्रेरणा घेत कला कशी फुलवायची हे जाणून घ्यायचं होतं. पर्यावरणासाठी कलात्मक चळवळ चालवायची होती.

वालावलकर सरांना याही सगळ्यांना लिहितं करायचं होतं. Personal is universal असं म्हणत ते जमलेल्या सगळ्यांना पुन्हापुन्हा एकत्र आणत होते. संवाद घडवत होते. यातूनच 'आपलं पर्यावरण' या मासिकासाठी काही क्रिएटीव्ह आयडिया निघाल्या. विद्यार्थ्यांना लिहायला सांगण्यापासून ते पर्यावरणाची शब्दकोडी, कविता यापर्यंत. 'आपलं पर्यावरण'चं काम पाहणारे संजय जोशी सर, कविता वालावलकर आणि सुरभि हे सगळं लिहून टिपून घेत होते.

याच कार्यशाळेत माझा गाज... Call of the ocean हा लघुपट मी सगळ्यांसोबत पाहिला तेव्हा दृष्यांपेक्षाही मी माझं लेखन काळजीपूर्वक ऐकत होते. पुन्हा एकदा खरंच मी लिहिण्यापर्यंत येऊन ठेपले होते.

(पृष्ठ क्र.२४ वर)


# अँन फ्रँक : आत्ममग्न समाजभान

*१२ जून १९२९ ही अँन फ्रँकची जन्मतारीख. तिच्या स्मृती उजळवून टाकणारा चंद्रशेखर टिळक यांचा लेख - संपादक*

आपण एखादं पुस्तक कधी वाचतो याचा ते पुस्तक आवडण्याशी काही संबंध असतो का ?

पुस्तकाचा लेखक किंवा प्रमुख पात्र आणि वाचकाचे वय साधारणपणे एकच असेल तर त्या पुस्तकातील अनुभवांविषयी जास्तच जिव्हाळा वाटतो का?

त्यातही पुस्तकातील राजकीय - सामाजिक परिस्थितीशी साधर्म्य असणारी परिस्थिती ते पुस्तक वाचताना, निदान ते पुस्तक पहिल्यांदाच वाचताना काही प्रमाणात तरी, निदान काही भूभागात तरी प्रत्यक्षात पाहायला मिळत असेल तर अशा पुस्तकाशी लगेचच आणि जास्तच जवळीक साधली जाते का? या तिन्ही प्रश्नाचं उत्तर कदाचित नकारार्थी असेलही; पण "The Diary of Young Girl" हे Ann Frank चे पुस्तक पहिल्यांदा वाचत असताना माझे मात्र असे झाले होते.




१३ - १५ वर्षांच्या मुलीचे अनुभव १५ - १६ व्या वर्षी वाचताना जास्त भिडतात. त्यातच त्यावेळी आपल्या देशात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पुकारलेली आणीबाणी ऐन भरात होती. त्या वातावरणात Ann Frank चे हे पुस्तक आणि आयर्विन्ग वलेसचे R Document सारखं पुस्तक यातली प्रत्ययकारी वर्णने भयचकित करायची !

या परिस्थितीत नंतरच्या काळात जरूर बदल झाले. पण या पुस्तकाने घातलेल्या मोहिनीत मात्र कधीच, काहीच, कोणताच बदल झालेला नाही. एका तरुण मुलीने लिहिलेली 'डायरी' असे नाव असलेले हे पुस्तक नाझी दहशतवादाचे अत्यंत बोलके चित्र उभे करते.

१४ जून १९४२ रोजी या डायरीतली पहिली नोंद आहे . १ ऑगस्ट १९४४ रोजी त्यातली शेवटची नोंद आहे . Ann च्या १३ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने तिच्या वडिलांनी तिला ही डायरी भेंट दिली होती. साऱ्या पुस्तकभर या डायरीचा उल्लेख Ann ने सतत Kiti असा केला आहे. त्यात अगदी काटेकोरपणाने रोजच्या रोज, न चुकता नोंदी केल्या आहेत अशातला काही भाग नाही. तिचर वय, नंतरची परिस्थितह बघता ते साहजिकच आहे. पण त्यात Ann ने व्यक्त केलेले विचार, भावना, अनुभव अतिशय सुन्न करून टाकतात.

फ्रण्कफर्टच्या एका उत्साही, ज्यू उद्योजकाची (Oto Frank) गंभीर आणि विचारी अशी ही कन्या. हिटलरचा जर्मनीमधे उदय झाल्यानंतर Annच्या वडिलांनी आपली पत्नी आणि २ कन्या यांच्यासह १९३३ साली आपला मुक्काम ॲमस्टरडॅमला हलवला. पण हिटलरच्या साम्राज्यविस्तारामुळे ॲमस्टरडॅममधेही ज्यूंचे भवितव्य अंधारी बनले. एकाहून एक अपमानजनक बंधने घालत

त्याची सुरुवात झाली. हळूहळू त्यांची छळ – छावणीत रवानगी होऊ लागली. त्यातून वाचण्यासाठी Oto Frank यांनी सहकुटुंब स्थलांतर केले.

६ जुलै १९४२ रोजी आपल्याच ऑफीसच्या कोंदट तळघरात त्यांनी बाड-बिस्तरा हलवला. त्या जागेत बाह्य जगाशी संपर्क तुटलेल्या अवस्थेत राहत असताना Ann Frank या कोवळ्या मुलीच्या मनातील विचारांची अत्यंत मोकळेपणाने आणि धीटपणे केलेली नोंद असे या पुस्तकाचे स्वरूप आहे .

४ ऑगस्ट १९४४ रोजी त्यांच्या या गुप्त निवासाचा नाझी सैनिकांना पत्ता लागला. नंतर Frank कुटुंबीयांची वेगवेगळ्या छळछावण्यांमध्ये रवानगी झाली. तिथेच Ann आणि तिची मोठी बहीण यांचं निधन झाले. तिथून सुटका झाल्यावर Oto Frank जेंव्हा ॲमस्टरडॅमला परत आले तेंव्हा त्याना हे हस्तलिखित मिळाले. त्यातून हे पुस्तक जन्माला आले .

या नष्टचर्याला सुरुवात होण्याआधी या सुस्वरूप कन्येला आपण हॉलिवुडमधे अभिनेत्री व्हावे असे कधी कधी वाटत असे. स्वतःच्या लहानपणीच्या एका छायाचित्रावर तशी टिप्पणी तिने केल्याची नोंद या पुस्तकात आहे. पण नियतिच्या संकेतातून कॅमेराचा उजेड तर सोडाच; पण या कोवळ्या मुलीला आधी अंधाऱ्या जागेला आणि नंतर छळछावणीच्या सर्वंकष अंधाराला सामोरे जावे लागले. अर्थात ही परिस्थिती तेंव्हा अनेकांच्या वाट्याला आली. १३ ते १५ वर्षे हा आयुष्याचा काळ प्रत्येक मुलीच्या आयुष्यात एका वेगळ्या अर्थाने महत्त्वाचा असतो. पण Ann Frank च्या आयुष्यात तो फारच वेगळा ठरला. या काळाने तिला केवळ परिपक्कच नव्हे तर फारच समंजस आणि प्रौढ बनवले. अभिनेत्री होण्याची तिची इच्छा जरी पुरी झाली नसली तरी, I want to go on living even after my death ही तिची इच्छा मात्र अगदी नक्की पुरी झाली आहे.

१९४५ साली तिचं निधन झाले.

पण आजही तिची आठवण ७५ वर्षानंतरही अमर आहे. तिच्या या पुस्तकाचे आज जगातील जवळ जवळ सर्वच भाषांत अनुवाद झाले आहेत. हे त्या इच्छापूर्तीचेच एक रूप आहे . हे पुस्तक एकदा वाचलेला संवेदनशील वाचक त्याच्या आयुष्यात हे पुस्तक विसरूच शकत नाही हे त्याचे दुसरे रूप आहे. 'नाझी राजवटीत ६० लाख ज्यूंची हत्या झाली असेच केवळ नाही तर प्रत्येक ज्यूवर ६० लाख वेळा मरण्याची वेळ आली,' या आबेल हेर्जबेर्ग यांच्या वर्णनाची यथार्थता हे छोटेखानी पुस्तक त्याच्या प्रत्येक पानावर पटवत राहते, हे त्याचंच आणखीन एक रूप आहे.

सुमारे ७०-७५ वर्षांपूर्वी स्वतःचे अनुभव नोंदवताना Ann Frank Zo या पुस्तकात, डायरीत व्यक्त केलेले अनेक विचार आजही आपल्याला अंतर्मुख करतात. या पुस्तकातील उल्लेखांचे संदर्भ आज बदलले असतील; पण त्यांची यथार्थता जरासुद्धा बदललेली नाही. युद्धात प्रत्येक दिवशी कोट्यवधी रुपये खर्च करताना गरीब जनतेसाठी, वृद्ध कलाकारांसाठी, आरोग्य, शिक्षण यासाठी निधी अपुरा पडतो असे कोणाच्याही मनात कसे येत नाही या Ann Frank ने विचारलेल्या प्रश्नाचा आज संबंध, संदर्भ, संपर्क उरलेला नाही असे कोण म्हणू शकेल ?

जगाच्या एका कोपऱ्यात अन्नधान्याची गोदामे ओसंडून वाहात असताना दुसऱ्या भागात भूकबळी का पडावेत हा या पुस्तकात Ann Frank ने विचारलेला दुसरा प्रश्नही असाच.

एखाद्या निरपराध सामान्य नागरिकाला त्याचे जिणे जगता येऊ नये, इतकी एखाद्या सत्ताधीशाचीच मर्जी

जनतेच्या कल्याणाकरिता जे एकमेकांना दगड मारतात, त्यांना 'राजकारणी' म्हणतात.- काऊपर

कशी काय महत्त्वाची ठरू शकते आणि त्याचा अटकावही कसा होत नाही, असाही मुद्दा ती या पुस्तकात उभा करते. ते वाचताना Ann Frank चे शारीरिक स्वास्थ्य ढासळत असले तरी या बालिकेचे मनोधैर्य जरासुद्धा खचलेले नाही याची प्रचीती येत राहाते. सत्य सांगण्यास तरुण मंडळी जरासुद्धा कचरत नाहीत या तत्त्वावर Ann Frank ची असणारी अढळ श्रद्धा आजही नक्कीच आवश्यक वाटते. युसुफजादी मलाला हे अलीकडे घडलेले त्याचेच उदाहरण. अर्थातच इतरही अशी उदाहरणे आहेत.

मला पडणारा प्रश्न हा आहे की, अशी उदाहरणे असतात यांत दिलासा शोधायचा, की अशा उदाहरणांना असणारी पार्श्वभूमी परत परत परत उद्‌भवते याची विषण्णता मानायची?

आज हिटलरही अस्तित्वात नाही आणि Ann Frank ही नाही.

पण तिच्या आयुष्याला ग्रासून राहिलेला अतिरेकी वंशवाद वेगवेगळ्या रूपात पुढे येतोच आहे. (अशा अर्थाने आपण मृत्यूनंतर जगावे असं काही नक्कीच – Ann Frank ला वाटत नसेल!).

एखाद्या वंशाच्या श्रेष्ठतेच्या समजुतीमुळे इतरांना जगण्याचा आधिकार नाही असे आज उघडपणे कोणी म्हणणार नाही; कदाचित !

निदान तशा शब्दांत ....पुन्हा कदाचित !<br>
पण त्याच्या छटा दिसतातच.<br>
अगदी आजही ...

संवादाच्या अभावामुळे वादाचा प्रभाव वाढतो आणि असा प्रभावच अनेकदा अतिरेकी दहशतीला कारणीभूत ठरतो. Ann Frank च्या डायरी मधे उभा राहणारा नाझी दहशतवाद फारच एकारलेला वाटावा अशा विविध स्वरूपात तो आज ऑक्टोपस सारखा फोफावत आहे. वांशिक दंगली पासून आर्थिक साम्राज्यापर्यंत आणि वित्तीय मांडलिकत्वांपासून राजकीय अरेरावीपर्यंत त्याची नानाविध रूपे जगभर सर्वत्र आणि सातत्याने सामोरी येत आहेत. पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस दोस्त राष्ट्रांनी खनिजांनी समृद्ध असा भूभाग तोडण्यापासून अनेक अपमानकारक अटी जर्मनीवर लादल्या. स्वाभिमानी जर्मनीच्या हृदयात त्याचे शल्य होते. त्याची चिंगारी फुलवत वांशिक श्रेष्ठत्व हा मुद्दा पणाला लावत हिटलर सर्वसत्ताधिकारी झाला. आज राजकीय मालकीपेक्षाही आर्थिक नाड्या ताब्यात असणे महत्त्वाचे आणि सोयीचे ठरते. त्यातून आखाती युद्धे उभी राहतात. अशी युध्दे उघडपणे दिसतात तरी ! पण स्वतःजवळ असणारा नकाराधिकार शस्त्र म्हणून वापरत जागतिक अर्थसंस्थांच्या माध्यमातून लहान आणि अविकसित देशांची किंवा परिस्थितीमुळे अगतिक झालेल्या राष्ट्रांची कशी ससेहोलपट केली जाते हे सर्वश्रूत आहे.

मग Masters of Illusion सारखे पुस्तक Ann Frank च्या डायरीचे दुसरे रूप वाटू लागते. अशा वेळी भौगोलिक सीमारेषा, राजकीय गटबंध, झेंड्याचे रंग हे निव्वळ मुलामे ठरतात. आणि निखळ बहुरंगी, विविधांगी दहशतवाद 'आ' वासून सामान्य नागरिकांचा घास गिळतात. त्याचा मुकाबला करण्यासाठी मग Ann Frank ची हिम्मत आठवत राहते.

अशावेळी मला एका मर्यादित अर्थाने Ann Frank आणि Ayn Rand समगोत्री वाटायला लागतात ....

एक संहिता तर दुसरी कृती – आराखडा (Action - Plan ). Ayn Rand तिच्या एका पुस्तकात म्हणतेच ना .... "The question is not who is going to let me ; its who is going to stop me?"

हे जसे एखाद्या राष्ट्राविषयी, वंशाविषयी, धर्माविषयी खरे आहे तसेच आपल्या दैनंदिन वैयक्तिक आयुष्याबाबतही

जर विज्ञानावर शहाणपणाचे नियंत्रण नसेल, तर ते भ्रमिष्टपणाने वागेल. – स्पॅनिश म्हण

खरे आहेच. कारण या धकाधकीच्या जीवनात Ann Frank सारख्या दीपस्तंभाची गरज वाढत आहे.

अशा वेळी Ann Frank १२ जून १९२९ रोजी जन्माला आली हे खरे; पण ती १९४५ साली निधन पावली हे खोटे वाटते. कारण Ann Frank तिच्या मृत्यूनंतरही आपल्या मनात जगत आहे.

सरते शेवटी, हे पुस्तक वाचत असताना मला नेहमीच आमच्या वरसईच्या गोडसे भटजी यांच्या 'माझा प्रवास' या पुस्तकाची आठवण येते. ते पुस्तक १८५७ च्या युद्धाबाबत एका सामान्य माणसाने केलेल्या नोंदी आहेत. त्यातल्या वेदनांची जातकुळी जरूर वेगळी आहे. पण या दोन्ही पुस्तकातले साम्य म्हणजे निरपराध सामान्य नागरिकांनी केलेल्या निपक्षपाती, स्वानुभवावर आधारित अशा या नोंदी आहेत. म्हणून त्या खूप महत्त्वाच्या आहेत.

साहित्य म्हणूनही आणि इतिहास म्हणूनही.

हेच खरं की हिटलरही आपलाच इतिहास असतो आणि Ann Frank ही ....

यातला कोणत्या इतिहासाला वर्तमान आणि भविष्यात 'पुनरागमनाय'च म्हणावं लागेल हे आपल्या हातात असतंही आणि नसतंही ! ! !

"History not only repeats, it rhymes . It never saws good- bye ....."

Ann Frank ....एक आत्ममग्न समाजभान ... सर्वार्थाने आजही संदर्भ राखून असलेले ! ! ! !

**– चन्द्रशेखर टिळक**
सी –४०२. राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ, राजाजी पथ,
डोंबिवली (पूर्व ) – ४२१२०१
भ्रमणध्वनी – ९८२०२९२३७६

•••

(पृष्ठ क्र.२० वरून - **झाडांना आपल्याबद्दल काय वाटतं ?**)

जिथे प्रेम नाही तिथे जायचं नाही
असं काहीतरी ठरवलं आहे म्हणे...
त्या डाळिंबी डोळ्यांनी...
आणि गिर्रेबाज तुऱ्यांनी !

नीरा नदीच्या काठावर आता न येणाऱ्या करकऱ्या क्रौंचांची कहाणी मी या कवितेतून मांडली. ती सगळ्यांना भिडली ती क्रिएटीव्ह रायटिंगमुळेच.

डिसेंबरच्या सुखावणाऱ्या हवेत असे दोन दिवस सृजनाचे होते. निघताना म्हाळगी प्रबोधिनीच्या आवारातल्या रस्त्यापाशी थबकले. संध्याकाळी उंच झाडांवरून ओघळायला लागलेली गगनजाईची फुलं वेचली. आणि त्यांचा गंध कुरवाळत आकाशाकडे पाहिलं.

पोपटांचे थवे पश्चिमेच्या दिशेनं निघाले होते. वाटलं... या दोन दिवसांत त्यांनाही नव्या वाटा सापडल्या असतील, झाडांना नवी पानं फुटली असतील...

इथे आले तेव्हा कांचनाच्या झाडाखाली माझा विचार करणारी मी झाडं, पक्ष्यांचा विचार करत होते.

मानवकेंद्रीत विचारांकडून निसर्गकेंद्रीत विचारांकडे आले होते...

'भूता परस्परे घडो मैत्र जीवांचे', असं म्हणत ज्ञानेश्वरांनी पर्यावरणाचा वैश्विक विचार मांडला. हाच विचार घेऊन मराठीमध्ये पर्यावरण लेखनाची चळवळ सुरू व्हायला हवी. आणि सभोवतीच्या निसर्गाला आपल्याबद्दल काय वाटतं हे आपण समजून घ्यायला हवं.

**– आरती कुलकर्णी**
ज्येष्ठ पत्रकार, आयबीएन लोकमत
भ्रमणध्वनी : ९९३०३६०५५६

•••

# प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था

(भाग-४)

*श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांचेतर्फे मार्च २०१७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था' हा श्री. मधुकर गजानन दातार यांचा लघुशोध निबंध 'दिशा' च्या वाचकांसाठी क्रमशः प्रकाशित करत आहोत - संपादक*

**अध्याय-४ प्रकरण-४**

**कौटिलीय अर्थशास्त्र**

**नागरी वस्तीची स्थापना (जनपदनिवेशः)**

भूतपूर्वं वा अभूतपूर्वं जनपदं निवेशयेत् ।

(राजाने) नगरांची स्थापना जुन्या (आधीच अपूर्ण असलेल्या ग्रामांत) किंवा नवीन जागेत ग्रामाची स्थापना करावी.

ग्राम क्रोशाद्विक्रोशसीमामन्योन्यरक्षे निवेशयेत् । शूद्रकर्षकप्रायं कुलशतावरं पञ्चशतकुलं परम् ।

नगरांची स्थापना, एकमेकांपासून कोस किंवा दोन कोस इतक्या अंतरावर करावी.ज्यामुळे दोन भिन्न नगरवासीयांना (अडी-अडचणीचेवेळी) एकमेकांना मदत आणि (संकटकाळात) रक्षण देणे शक्य होईल. एका नगरात साधारणतः १०० ते ५०० कुटुंबांची वसाहत करावी. लोकवस्तीत कामगारवर्ग आणि शेतकरीवर्ग प्रामुख्याने असावा.

नदीशैलवनसृष्टीदरीसेतुबंधशाल्मलीक्षीरवनान्तेषुसीमांस्थापयेत् ।

नगराची सीमा सुरक्षित रहावी म्हणून नगरसीमा अशी असावी - जेथे नदी, टेकडी, झाडे-झुडपे, दरी, शमी-शाल्मली वृक्ष किंवा बोरीची झाडे असावीत.

अष्टशतग्राम्यमध्ये स्थानीयं चतुःशतग्राम्यामध्ये द्रोणमुखम् । द्विशतग्राम्या (मध्ये) खर्वटिकं, दशग्रामीसंग्रहेण संग्रहणं स्थपयेत् ।

८०० लहान गावांच्यामध्ये एक शहर असावे, ४०० लहान गावांच्यामध्ये एक उत्तम गांव असावे, २०० गांवामध्ये एक रक्षास्थान (रक्षकाधिकाऱ्याचे अधिष्ठान) १० गावांच्या समूहासाठी एक रक्षक (Police) असावा. २०० गावांमध्ये एक गांव (डोंगरमाथ्यावर) सहलीसाठी असावे.

अन्तष्वन्तपालदुर्गाणि । जनपद द्वाराण्यन्तपालाधिष्ठानि भवेत् ।

गांवाच्या सीमेवर (सीमारक्षणासाठी) गडकोट असावेत. सीमारक्षणासाठी सुयोग्य अधिकारी (नेमलेले) असावेत.

वस्तुसंग्रहालयाच्या बाहेरील बाजूस २४ अंगुले रुंदीचे एक पात्र पर्जन्यमापक (पर्जन्याचे माप मोजण्यासाठी) (Rainguage) म्हणून ठेवले जावे.

**राजमार्गाः(कौटिलीय अर्थशास्त्र)**

त्रयः प्राचीनाः त्रयाः उदीचीना इति वास्तुविभागः । स द्वादशद्वारोयुक्तोदकभूमिच्छनपथः चतुर्दण्डान्तरा रथ्याः । राजमार्ग द्रोणमुख स्थानीय राष्टविनीतपथाः संथानीय व्यूहश्मशानग्रामपथाश्चाष्टदण्डाः । चतर्दण्डः सेतुवनपथः । द्विदण्डो हस्तिक्षेत्रपथः । पञ्चरत्नयो रथपथश्चत्वारः । द्वौ क्षुद्रमनुष्यपथः ।

वास्तुविभागाने, तीन रस्ते पूर्व-पश्चिम दिशांना आणि तीन रस्ते उत्तर-दक्षिण दिशांना जाता येईल

सगळे मनासारखे होते असे नाही, पण मनासारखे झालेले विसरू नका.

याप्रमाणे योजना करावी. (त्यामुळे नगराचे सहा विभाग होतील अशा नगराला १२ प्रवेशद्वारे असावींत. त्यातील काही द्वारे भूपृष्ठावर, काही जमिनीखालून (underground Tunnels) जाण्यासाठी (विशेषतः ज्या रस्त्यांवर रथ, हत्ती, घोडे इत्यादी वाहनांमुळे इच्छितस्थळी जाता येत नाही, अशा ठिकाणी जाण्यासाठी) योजावेत. या सर्व रस्त्यांची रुंदी आठ दण्ड असावी.

राजमार्ग, उत्तम गावांतील रस्ते, स्थानीय रक्षाधिकाऱ्यांची कार्यालये, संरक्षण व्यवस्थेसाठी योजलेले रस्ते, रक्षाधिकाऱ्याच्या कार्यालयाकडे, बाजार, स्मशान यांच्याकडे जाणारे रस्ते आठ दण्ड रुंदीचे असावेत. हत्तींच्या अरण्याकडे जाणारे रस्ते दोन दण्ड रुंदीचे असावेत. राजा आणि त्यांचे मंत्रिगण यांच्या रथांसाठी चार रस्ते असावेत. दोन रस्ते लहान प्राणी, श्वान, शेळी, बक-या यांसाठी आणि सेवाकार्यात असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी दोन रस्ते असावेत.

**जकात अधिकारी, वस्तूकर अधिकार**
**(Superintendant of Polls)**

नगराच्या सीमेवर बाहेरच्या गावांतून येणा-या मालावर जकात अधिकाऱ्याने ११/४ पन (१०० कवडया) इतका जकात कर गावांत येणाऱ्या प्रत्येक मालावर आकारावा. डोईवरून वाहून आणणाऱ्या मालासाठी ५ ते ८ गुंजा इतकी जकात आकारावी. अत्यंत जीवनावश्यक माल (जीवरक्षक औषधे वगैरे) आणि (जिराईत व बागाईत शेतीसाठी बियाणे) बियाणे यावर जकात आकारू नये.

बाहयमाभ्यन्तरं च आतिश्यम् । निष्काम्य प्रवेश्यं च शुल्कम् । पुष्पफलशाककन्दमूलवालिक्यबीजमत्स्यमांसांनां षड्भागं ग्राहयम् ।

बाहेरून तसेच नगरातील आणि परराज्यांतून आलेल्या सर्व विक्रीवस्तूंवर जकात आकारली जावी. (हारांसाठी) फुले, फळे, भाजीपाला, कन्दमूळ आणि मोठी फळे (टरबूज वगैरे) (शेती-बागा) यांसाठी बियाणे, सुके मासे, यांसाठी जकात अधिकाऱ्याने मूळ किंमतींच्या १/६ किंवा १६% इतके शुल्क वसुल करावे.

वस्त्रचतुष्पदद्विपदसूत्रकार्पासगन्धभैषज्यकाष्ठवेणुवल्कलचर्ममृद्भाण्डनां धानास्नेह क्षारलवणमद्यपक्वान्नादीनां च विंशतिभागः पञ्चविंशतिभागो वा ।

वस्त्रे (कापड), चतुष्पाद प्राणी (विक्रीसाठी आणलेले घोडे,गाढवे, बैल, गाय, बकरे, म्हैस इत्यादी) द्विपाद प्राणी (?) सुती धागे, कापूस, सुगंधी द्रव्ये, औषधे, लाकूड, बांबू (वेळू), मातीची भांडी (रांजण वगैरे), धान्ये, तेले, (क्षार) मीठ, लोणचे वगैरे, मद्य, शिजवलेले अन्न (तांदळाचा भात, खिचडी वगैरे) या वस्तूंवर मूळ किंमतीच्या १/२० ते १/२५ इतकी जकात आकारावी.

द्वारदेयशुल्कम् ।

द्वारदेयशुल्कं पञ्चभागं अनुग्राहिकं वा यथोपदेशकारं स्थापयेत्। जातभूमिषु पण्यानामविक्रयः ।

नगरांत नवीन वस्तु आणताना प्रथम पाच टक्के इतकी जकात घेण्यात यावी. परंतु आवश्यकतेनुसार किंवा परिस्थिती जशी असेल, त्याप्रमाणे प्रवेशशुल्क (जकात) नाही घेतले तरी चालेल. ज्या ठिकाणी पीक घेतले जाते तेथे विक्री करू नये. तसेच ज्या ठिकाणी (औद्योगिक उत्पादन) घेतले जाते तेथेही त्या उत्पादनाची विक्री करू नये.

खनिभ्यो धातुपण्यादानें षट्शतं अत्ययः ।
पुष्पफलवारेभ्यः पुष्पफलादाने चतुष्पञ्चशतपणो दण्डः ।

खाणीतून काढल्या जाणाऱ्या मालाची खाणीच्या परिसरात विक्री केल्यास ६०० पट इतका दण्ड

आकारण्यात यावा. फुलबागा आणि फळबागा यांच्या क्षेत्रांतच फुलांची आणि फळांची विक्री केल्यास ४०० ते ५०० पट इतका दण्ड जकात अधिकाऱ्याने आकारावा.

क्षौमदुकुलकृमिताणकङ्काटहरितालमनःशिला० जनहिङ्गुलकलोहवर्णधातुना चन्दनागुरु कटुककिण्वावराणां चर्मदन्तास्तरणप्रावरणकृमिजातानाम् आजेण्डकस्य दशभागः पञ्चदशभागो वा ।

तागाचे कापड, सुती कापड, रेशीम चिलखत, गवतापासून तयार केलेल्या वस्तु, मनशील धातूच्या (मँगेनीज) वस्तु, हिंग, लोह आणि त्या वर्गातील धातू, चन्दन, मोहरी, मसाले आणि त्यांचे वेगवेगळे प्रकार, कातडे, वस्त्र आणि त्यातील वेगवेगळे प्रकार (धोतर, साडी, कुर्ता इ.) कीटकापासून बनवलेली वस्त्रे (रेशीम वगैरे) लाख, मेण, प्रवाळ, मध, रेशीम, मोती, बकरी आणि शेळ्या यांपासून मिळणारी लोकर या पदार्थांवर मूळ विक्रीच्या किंमतीच्या १/१० ते १/१५ इतके शुल्क घेण्यात यावे.

कौटिल्याने वाहतुकीची साधने याचेही तपशील दिले आहेत.

रथांचे विविध प्रकार आणि त्यांची लांबी, रुंदी, उंची याबद्दलचे निकष, उत्सव प्रसंगी वापरण्यात येणारा रथ 'पुष्यरथ' असा मानला जातो. समर प्रसंगी वापरण्यात येणारा रथ 'सांग्रमिक' तर प्रवासासाठी एका गांवाहून दुसऱ्या गांवाकडे जाणारा रथ 'परियानिक' असा संबोधला जातो.

उत्तम रथाची उंची १० हात, रुंदी १२ हात असावी, रथांची उंची तीच ठेवून १ हाताने कमी करत करत सहा हात रुंदीपर्यंत सात वेगवेगळे रथ केले जाऊ शकतात.

हत्ती चार प्रकारचे, 'भद्र', 'मृग', 'मन्द्र', 'संकीर्ण', भद्र – चांगला हत्ती, सर्व आज्ञा पाळणारा, मृग – चपळ हत्ती, मन्द्र – सावकाश चालणारा हत्ती, संकीर्ण – मस्तवाल हत्ती?

आठ जातींच्या घोड्यांचा उल्लेख आहे.

१) तुरक – तुर्कस्थानांतून आलेले, २) दक्ष – दक्षिण भागांतून (?) आलेले, ३) वेणा नदीच्या तीरावरून आलेले, ४) वेगवती (बेतवा?) नदीच्या तीरावरून आलेले, ५) चण्ड – उष्ण प्रदेशातून आलेले (?) ६) महावन – ओरिसा, बंगाल, आसाम या भागातील अरण्य प्रदेशांतून आलेले, ७) डहाळ देशांतून आलेले, ८) प्रांत देशांतून आलेले.

खालील तपशील (Institution of Civil Engineer) यांच्या एका मासिक अंकातून घेतला आहे.

'राजमार्गास्तु कर्तव्या चतुर्दिक्षु नृपगृहात्।

'राजमार्ग' (प्रमुख मार्ग) राजगृहापासून चारही दिशांना जाणारे असे तयार करावे.

उत्तमो राजमार्गस्तु त्रिंशध्दस्तमितो भवेत् ।<br>
मध्यमो विंशतिकरो दशप०चकरोडधमः ।।

राजमार्ग किंवा महामार्ग तीस हात रुंदीचा असावा. त्यानंतर अधिक महत्त्वाचा मार्ग – बाजारपेठ, शासकीय कार्यालय यांकडे जाणारे रस्ते २० हात रुंदीचे आणि त्यापेक्षा कमी महत्त्वाचे रस्ते १५ हात रुंदीचे असतात.

करत्रयात्मका पद्या वीथिः पञ्चकरात्मिका ।<br>
मार्गो दशकरो प्रोक्तो ग्रामेषु नगरेषु च ।।

पदपथांची रुंदी तीन हात असावी. अरुंद रस्ता किंवा गल्लीतील रस्त्यांची रुंदी पाच हात असावी. तालुक्याच्या गांवातील व इतर कमी महत्त्वाच्या गांवातील रस्त्यांची रुंदी १० हात असावी.

प्राक्पश्चाद्दक्षिणोत्तरात् ग्राममध्यात्प्रकल्पयेत् ।<br>
पुरं दृष्ट्वा राजमार्गान्सुबहुन्कल्पग्रेननृपः ।।

---

मन ओळखणाऱ्यांपेक्षा मन जपणारी माणसे हवीत. कारण ओळख ही क्षणभरासाठी असते तर जपवणूक आयुष्यभरासाठी.

राजाने नगराच्या महत्त्वाप्रमाणे आवश्यक तितके रस्ते करावेत. उदा. बाजारपेठा, राजगृह, सचिवालय, सहलीची ठिकाणे इ.

न वीथिं न पद्यां हि राजधान्यां प्रकल्पयेत् ।
षड्योजनान्तरेऽरण्ये राजमार्गं तु चोत्तमम् ।।

राजधानीत मात्र गल्ली किंवा अरुंद रस्ते करू नयेत. राजधानीपासून सहा योजने दूर असलेल्या अरण्याकडे जाणाऱ्या रस्त्याची (शिकारी किंवा सहलीसाठी योजलेल्या) रुंदी राजमार्गाइतकीच असावी.

कल्पयेन्मध्यमं मध्ये तयोर्मध्ये तथाधमम् ।
दशहस्तात्मकं नित्यं ग्रामे ग्रामे नियोजयेत् ।।

प्रत्येक नगरांत दहा हात रुंदीचे मध्यम महत्त्वाचे असे रस्ते असावेत. त्यांना जोडणारे (गल्लीकडून येणारे–जाणारे) रस्ते त्यापेक्षा कमी रुंदीचे असावेत.

कूर्मपृष्ठा मार्गभूमिः कार्या ग्राम्यैः ससेतुका ।
कुर्यान्मार्गान् पार्श्वखातान्निर्गमार्थं मलस्य च ।।

ग्रामस्थांनीं, त्यांच्या गांवातील रस्ते कासवाच्या पाठीप्रमाणे – कासवाच्या पाठीइतके टणक आणि त्याच्या दोन्ही (पाठीच्या दोन्ही बाजूस) असलेल्या अत्यंत कमी उताराप्रमाणे करून घ्यावेत. (ही कार्यपद्धती सध्याच्या रस्त्याच्या प्रचलित नियमावलीप्रमाणेच आहे. म्ह. रस्त्यांच्या दोन्ही बाजूस कसा Camber किंवा उतार असावा हे. सा. बां. विभागाच्या कार्यपद्धतीत (Specs) नमूद केले आहे.) या रस्त्यांच्या दोन्ही बाजूस गटारे आणि मलनिःस्सारणासाठी छोट्या नलिका असाव्यात.

राजमार्गगृहाणि स्थुर्गृहाणि सकलान्यपि।
गृहपृष्ठे दासवीथिं मलनिर्हरण स्थ्वम् ।।

राजमार्गावरील सर्व दारांची प्रवेशद्वारे रस्त्याच्या उभय बाजूंना असावीत. घराच्या मागील बाजूस सेवकांच्या जाण्यायेण्यासाठी रस्ता तसेच मलनिःस्सारणाची मार्गिका (नलिका) असावी.

पङ्क्तिद्वयगतानां हि गेहान्कारयेत्तया ।
मार्गान्सुधाशर्करैर्वा घटितान्प्रतिवत्सरम् ।।

घरे दोन ओळीत असावीत आणि रस्ते प्रतिवर्षी चुनखडी आणि खडी यांचे मिश्रणाने दणकट करावेत.

अभियुक्तिनिरूध्दैर्वा कुर्याद्ग्राम्यजनैर्नृपः
ग्रामद्वयान्तरे चैव पान्थशालां प्रकल्पयत् ।। (नृपः)

(एकाद्या खटल्यात आरोप ठेवल्याने – तुरुंगात असलेल्या) आरोपामुळे बंदिस्त केलेल्या कैद्यांकडून किंवा ग्रामस्थांकडून रस्ते करून घ्यावेत. दोन गांवांच्यामध्ये (राजाने) एक विश्रामगृहाची स्थापना करावी.

वाहतुक आणि रस्तेबांधणी हे विषय नगररचनेशीच पूर्णतया निगडित आहेत. त्यामुळे 'नगररचना' या विषयावर आवश्यक तेवढा भाग यापुढे दिला आहे. नगरांचे विविध प्रकार हे त्या ठिकाणचे उत्पादन, उद्योग, क्षेत्रफळ, नदी–समुद्र किंवा डोंगर यांचे सान्निध्य, यावरून ठरवले जातात. हे प्रकार प्रत्येक ग्रंथकाराच्या मतानुसार वेगवेगळे असू शकतात. या संदर्भात 'अपराजितपृच्छा' कामिकागम (स्थापत्यवेद), मयमतम् (शिल्पशास्त्रम्) 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'मानसार', 'समराङ्गणसूत्रधार' या सर्व ग्रंथांच्या रचयित्यांनी नगरांच्या वेगवेगळ्या वैशिष्ट्यांप्रमाणे नगरांची वर्गवारी केली आहे. प्रत्येक ग्रंथकारांच्या मतानुसार या विषयांत थोडीफार मततमांतरे आहेत. पण प्रत्येक ग्रंथकाराचा त्याच्या वेळचा काळ (इ.स.प्रमाणे) आणि तो रहात असलेला प्रदेश यांच्या वैविध्यांमुळे अशी मतांतरे अपरिहार्य आहेत. नगररचना हा विषय खूपच विस्तृत आहे. यावर आणखीही काही ग्रंथ उपलब्ध आहेत. पण आवश्यक तेवढ्याच ग्रंथांचा आधार घेऊन

(पृष्ठ क्र.४० वर)

एखाद्याला सोडून जाताना मागे पहावसं वाटले तर पुढे जाऊच नये. जीवघेण्या माणसांच्या गर्दीत एकटे राहण्यापेक्षा जीव लावणाऱ्या माणसाच्या मनात भरून रहावे.

# प्रतिज्ञा - काळाची गरज

*'प्रतिज्ञा घेणे' याचे गांभीर्य आपण मातीमोल केले आहे. या लेखात 'प्रतिज्ञा घेणे' याचा अर्थ विचारपूर्वक समजून दिला आहे - संपादक*

'प्रतिज्ञा घेणे' या वाक्प्रचाराचा अर्थ असा की, 'एखादे कार्य करण्याची स्वतःला आज्ञा देणे व त्या आज्ञेचे आपण पालन करणार आहोत हे सर्वांसमोर स्पष्ट करणे.' एकदा प्रतिज्ञा घेतली की, त्या कार्यात आपण आपले प्राण ओतले पाहिजेत. शिवाजी महाराजांनी 'स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा 'एकदाच' घेतली, पण ते कार्य त्यांनी आजन्म अविरत सुरू ठेवलं. प्रत्येक श्वास म्हणजे 'स्वराज्य स्थापने'चा पैलू ठरत गेला. इतकं एकरूप होणं म्हणजे प्रतिज्ञा पूर्ण करणं होय.

आपण भारताच्या एकात्मतेची प्रतिज्ञा लहानपणापासून अनेक वेळा घेतली आहे. पण त्याचे आचरण किती वेळा केले आहे? 'प्रतिज्ञा घेणे' याचा अर्थच आपण बदलला आहे. ज्याप्रमाणे 'Sorry', 'Thank You' या शब्दांचे मूल्य आपण घटवले त्याप्रमाणेच 'प्रतिज्ञा घेणे' याचे गांभीर्य आपण मातीमोल केले आहे.

'प्रतिज्ञा' या शब्दाचेच कधी आचरण नाही, तर त्यातल्या प्रत्येक वाक्याचा अर्थ कधी विचारपूर्वक समजून घेतला असेल का? विचार करू या आज जरा!

'भारत माझा देश आहे' या वाक्याने आपण प्रतिज्ञेची सुरुवात करतो. 'माझा' या शब्दावर जोर दिला तर त्या वाक्याचा अर्थ जास्त स्पष्ट होईल. एखादी वस्तू जेव्हा 'माझी' असते तेव्हा तिची किंमत आपल्यासाठी प्राणांपेक्षा जास्त असते. 'स्वतःची' वस्तू जीवापाड जपणं हा मनुष्य स्वभाव! मग हेच आपण 'माझ्या' देशाच्या बाबतीत वागतो का? 'माझ्या' देशाची काळजी घेताना आपला 'मी'पणा कुठे हरवतो? देशाविषयी उच्चारलेले अवाक्षर आपणही आनंदाने स्वीकारतो, मग खरंच भारत 'माझा' देश आहे? किल्ले, ऐतिहासिक वास्तू यांची नासाडी होताना आपल्यातल्या कुणा संवेदनशील व्यक्तीचा 'देशाभिमान' जागा झाला की, आपण त्या व्यक्तीचीच चेष्टा करतो, खिल्ली उडवतो. प्रतिज्ञेतल्या या वाक्याची व्याप्ती मनात रुजायला हवी.

'सारे भारतीय माझे बांधव आहेत' या वाक्यातही 'माझे' शब्द आहेच! पण पुढचा शब्दही महत्त्वाचा आहे, तो म्हणजे 'बांधव'. म्हणजे भाऊ-बहीण. 'सारे भारतीय बांधव असणं' ही संकल्पना संत ज्ञानेश्वरांच्या 'हे विश्वचि माझे घर' या ओळींची आठवण करून देते आहे. पण आम्ही इथे सख्ख्या भावंडांशी पक्के वैर पत्करले आहे, तर आमच्या मनात संपूर्ण भारत एक कुटुंब ही संकल्पना मूळ धरणार कधी? आम्ही 'एकटेच जगणार' आणि 'एकटेच मरणार' हेच आमच्या मनाने पक्कं केले आहे, तर आम्हाला 'बांधव' कधी कळणार!

'माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे.' अभिमान आहे? तोही परंपरांचा! आम्ही परंपरांना 'जुन्या' म्हणतो मग त्याचा आम्हाला अभिमान कसा असेल! मूळात 'रूढ करून दिलेले नियम' आम्हाला बेड्या वाटतात. 'नटलेल्या परंपरांना' आम्ही 'बुरसटलेले' म्हणण्यात धन्यता मानतो. पार्टी, गेम्स, नाईट क्लब याचा आम्हाला अभिमान वाटत असतो! 'परंपरा' म्हणून पारंपरिक पोशाख परिधान करण्याची लाज वाटणाऱ्या आम्हाला 'Days' साजरे

---

राग एकटाच येतो, पण जाताना आपल्यातली सर्व चांगली लक्षण घेऊन जातो.

करताना मात्र 'Traditional Days' सर्वात आधी हवा असतो. रूढ नियमांमागे असलेले हेतू समजून घेणं ही गरज आहे. परंपरांचा सन्मान आचरणात आला की, 'अभिमान' शब्द मनात आपोआप झिरपत जाईल आणि 'अभिमान' जागा झाला की, पाईक (सैनिक) होण्याची क्षमता निर्माण होतेच. शिवरायांचे कार्य पाहून लहान मुलामध्ये अभिमान जागा झालाच ना?

'खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे,
चिंधड्या उडवीन राई-राई एवढ्या'

ही ताकद यायला हवी.

आपली 'समृद्धी' आपल्या 'शेती' मध्ये आहे, हे तर आपण केव्हाच नाकारलंय. इतकं शिकून शेती करायची? या विचाराने आम्हाला पोखरलंय. आमच्या विचारांना 'कीड' लागल्यावर आमची शेतं विकली गेली. निसर्गाने दिलेले शेतीला पोषक असे वातावरण आम्हाला समृद्ध वाटत नाही. पैसा म्हणजे 'समृद्धी' हेच आम्ही गृहीत धरले आहे. त्यामुळे आज सर्व प्रकारचे धान्य संपूर्ण जगाला 'निर्यात' करण्याची क्षमता बाळगणारा 'माझा' देश धान्याची 'आयात' करतोय! कृषीची समृद्धी विकून, काँक्रिट जंगलांची समृद्धी वाढविण्यात आम्ही धन्यता मानली आहे, यापेक्षा विदारक दुसरे काय असेल!

'मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडिलधाऱ्या माणसांचा नेहमी मान ठेवीन आणि...' बापरे! काहीतरीच काय! पालकांचा आदर? आदर द्यायचा म्हणजे काय 'गिफ्ट' आहे का? आई-वडिलांना तर आम्ही एकेरी नावाने संबोधतोच पण आम्ही आजी-आजोबांचेही 'Granny' आणि 'Grandpa' असे 'एकेरी' नामकरण केले आहे आणि या माणसांचा आमच्या आयुष्यात फक्त 'उपदेशाइतकाच' सहभाग आहे. यांच्याशी आमही संवादही साधत नाही, तर आदर वगैरे काहीतरीच! 'गुरू' - 'ज्याला ('ज्यांना' नाही) फक्त आमच्यावर ताशेरे ओढण्यासाठी नेमले आहे', हेच आमच्या मनात आहे, त्याला आम्ही मान कसा देणार? ही स्थिती बदलण्यासाठी पुन्हा आपणच सुरुवात करायला हवी!

'... आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.' आम्ही स्वतःमध्ये इतके मग्न असतो की, समोरच्याला धक्का देऊन वर मस्त चार शिव्याही देतो. सौजन्य-विनयशीलता, सभ्यता या गोष्टी फक्त कथांमध्ये, नाटकांमध्येच असतात, असेच आम्ही वागू लागलोय. Facebook, Whats App वर एखादी धार्मिक, राजकीय खळबळजनक Post आली की, आमचं सळसळत रक्त अजूनच उफाळतं आणि मग थोडे शिल्लक असलेले सौजन्यही आम्ही Comment मध्ये उधळून टाकतो. मग कसे उरणार सौजन्य?

'माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी (हजारवेळा केलेली) प्रतिज्ञा पुन्हा करीत आहे.' वाक्यागणिक 'हे काय अवघड सांगताय?' असा प्रश्न पडतो. आम्हाला 'सख्खे' भाऊ-बहिण डोकेदुखी वाटतात, तर देशबांधव कुठले आले? त्यांच्याशी निष्ठा राखायची? देशाशी निष्ठा राखली तर भूकबळीची भीती वाटते आम्हाला! हे दुर्दैव आहे. आपणच जर देशावर अविश्वास दाखवला तर पुन्हा East India Company यायला वेळ लागणार नाही.

'त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी यातच माझे सौख्य सामावले आहे.' आहे, नाही! हे काय! माझे सुख तर 'माझ्या' कामात आहे. मग माझे कल्याण होत असताना दुसऱ्याचे कल्याण झाले तरी मला काही वाटत नाही.

'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे,
घेता-घेता एक दिवस, देणाऱ्याचे हात घ्यावे.'

---

संयमसुद्धा एकटाच येतो पण येताना आपल्यासाठी कायमची चांगली लक्षण घेऊन येतो.
फक्त निवड कोणाची करायची हे आपणच ठरवायचे आहे.

या 'विंदा करंदीकरांच्या ओळींचा अर्थ कळला तर दुसऱ्याच्या समृद्धीमधले समाधान नक्कीच कळेल!

प्रतिज्ञेतील प्रत्येक वाक्य 'मी' पणाशी जोडलेले आहे. हा माझ्यातला 'मी' जेव्हा चांगल्या कार्यासाठी मान वर काढेल तेव्हाच प्रतिज्ञेतल्या प्रत्येक वाक्याला अर्थ प्राप्त होईल. आज आपण प्रत्येक वाक्याच्या विरुद्ध गोष्टी समाजात घडताना पाहतो आहोत. या सगळ्याला आपण सगळेच 'मी' जबाबदार आहोत. आपल्यातला 'मी' संकुचित झाला आहे. संतांची भूमी असणाऱ्या या आपल्याला संतांच्या 'मी'ची व्याप्ती आठवण्याची आवश्यकता आहे. विकास आमटे, प्रकाश आमटे, बाबा आमटे, अभय बंग यांच्याआधी आम्हाला दाऊद, कसाब कळतो. मग निष्ठा कशी जागी होणार? 'निष्ठा', 'सौजन्य', 'दुसऱ्याचे सुख' या संकल्पनांपासून आज आपण इतके दूर आलो आहोत की, रोज 'नुसती' प्रतिज्ञा घेऊन (जी आपण 'म्हणतो') काही उपयोग नाही. 'देशप्रेम', 'देशभक्ती' हे फक्त '१५ ऑगस्ट', '२६ जानेवारी' याच दिवशी आमच्या रक्तात सळसळतात. या दोन दिवसांची हीच नावं आपण प्रचलित केली आहेत. या सगळ्या अनोगोंदीची चीड आपल्या मनात असूनही आपण 'शांत' रहातो! हे बदलायला हवं.

प्रतिज्ञेची पोपटपंची थांबवून प्रत्येक वाक्य आपण जगायला हवं, आतातरी! 'प्रतिज्ञा' ही काळाची गरज आहे, पण ती नुसती 'पाठांतर' म्हणून नाही तर कृती म्हणून! आता 'प्रतिज्ञा पाळू' अशी प्रतिज्ञा घेत न बसता, प्रत्यक्ष कृतीच काळाचा कायापालट करेल. नाहीतर हाही काळ पोपटपंचीत निघून जाईल आणि आपण फक्त पाहात राहू! (जमेल तितकी निंदा करत!)

**– सौ. श्रुती कर्वे–भिडे**

भ्रमणध्वनी : ७७६७८५०२३९

●●●

## शब्द

शब्द भावनेचे वाटकरी
नात्यामध्यल्या जिव्हाळ्याचे सांधकारी
शब्दच तर होते
बोलून गुज सांगताना
शब्दच तर होते
अबोल भाव टिपताना

शब्द हसायचे
शब्द रडवायचे
शब्दाशब्दांतून भाव रुसायचे
शब्द जणू टिपूर चांदणं
नव्या नवतीच जणू नांदणं

आठवण शब्दाची
घालमेल मनाची
जिव्हारी लागल्या जखमेची
उधळण शब्दाची
फुलत्या फुलांची
सल न बोलल्या शब्दाची
अन हसुन सोसल्या दुःखाची

शब्दची आधार जाहले
मरून उरण्यास कारण झाले
उरतील शब्दच...
रडतील शब्दच
आठवुनी तुज सांगतील शब्दच
शब्द भावनेचे वाटकरी
अन् जिव्हाळ्याचे सांधकारी...

**– डॉ. मिथुन बनसोडे**

विजिटिंग फॅकल्टी,

व्ही.पी.एम.चे टीएमसी लॉ कॉलेज, ठाणे

---

# परराष्ट्र धोरणापुढील आव्हानात्मक कालखंड

*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या पंतप्रधानपदाच्या दुसऱ्या पर्वाची सुरुवात ३० मे रोजी शपथविधी समारंभानंतर केली. यावेळी मंत्रीगणांची निवड करताना त्यांनी सर्वांनाच एक आश्चर्याचा धक्का दिला. हा धक्का म्हणजे त्यांनी परराष्ट्र सेवेतील अत्यंत वरिष्ठ राजनैतिक अधिकारी राहिलेल्या एस. जयशंकर यांना निवृत्तीनंतर परराष्ट्र मंत्रीपदावर नियुक्त केले आहे. यामुळे एकूणच परराष्ट्र धोरणावर होणाऱ्या परिणामांवर भाष्य करणारा डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचा लेख - संपादक*

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या पंतप्रधानपदाच्या दुसऱ्या पर्वाची सुरुवात ३० मे रोजी शपथविधी समारंभानंतर केली. यावेळी मंत्रीगणांची निवड करताना त्यांनी सर्वांनाच एक आश्चर्याचा धक्का दिला. हा धक्का म्हणजे त्यांनी परराष्ट्र सेवेतील अत्यंत वरिष्ठ राजनैतिक अधिकारी राहिलेल्या एस. जयशंकर यांना निवृत्तीनंतर परराष्ट्र मंत्रीपदावर नियुक्त केले आहे. जयशंकर हे अत्यंत अनुभवी असून गेल्या तीस वर्षांपासून त्यांनी परदेशांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. चीन आणि अमेरिका या राष्ट्रांमध्ये भारतीय राजदूत म्हणून जबाबदारी पेलली आहे. गतवर्षी भारत-चीन यांच्यादरम्यान डोकलामचा जो संघर्ष उभा राहिला होता त्यात भारताची कणखर भूमिका दिसून आली त्याचे बरेचसे श्रेय जयशंकर यांना जाते.

### 'पहिले' परराष्ट्रमंत्री

स्वतंत्र भारताच्या इतिहासात असे पहिल्यांदाच भारतीय परराष्ट्र सेवेतील व्यक्तीला निवृत्ती नंतर त्वरित थेट मंत्रीपदी निवडण्यात आले. यापूर्वी हा प्रकार नटवरसिंह यांच्याबाबतीत दिसून आला होता. परंतु नटवरसिंह यांनी १९८४ मध्येच भारतीय परराष्ट्र सेवेचा राजीनामा दिला होता. २००४ मध्ये ते भारताचे परराष्ट्र मंत्री झाले. म्हणजेच राजीनामा दिल्यानंतर तब्बल एक दशकानंतर ते परराष्ट्र मंत्री झाले. परंतु जयशंकरन यांच्या सेवानिवृत्तीला अवघे एक वर्षच झाले आहे आणि दुसऱ्याच वर्षी त्यांना परराष्ट्र मंत्रीपदी नियुक्त करण्यात आले आहे. हा गुणात्मक फरक लक्षात घ्यायला हवा. जयशंकर यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा फार मोठा फायदा हा परराष्ट्र धोरणाला होणार आहे.

### परराष्ट्र धोरणातून आर्थिक हितसंबंध साधण्यावर भर

मोदी सरकारच्या पहिल्या पर्वामध्ये परराष्ट्र धोरण हे केंद्रस्थान आणि अग्रस्थानी राहिले. परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातूनच भारताने आपले आर्थिक हितसंबंध साधण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या पर्वामध्येही तशाच पद्धतीने परराष्ट्र धोरणावर भर देण्यात येणार आहे. पहिल्या पर्वाच्या शेवटी झालेल्या अनेक सर्वेक्षणांमधून परराष्ट्र धोरणाविषयी मोदी सरकारची कामगिरी उल्लेखनीय असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे दुसऱ्या पर्वातही मोदींकडून परराष्ट्र धोरणाला प्राधान्य दिले जाणार आहे. शपथविधी समारंभाला बिमस्टेक संघटनेच्या सदस्यांना बोलावणे, शपथविधीनंतरच्या आठवड्याभरात पंतप्रधानांनी मालदीव, श्रीलंका दौरा करणे, जयशंकर यांनी भूतानला भेट देणे आणि त्यापाठोपाठ आता मोदींनी किरगिस्तानला शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीसाठी जाणे या सर्वांवरून याची चुणूक दिसून आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील काळात व्यक्तिगत रस घेऊन परराष्ट्र धोरणाला एक नवा आकार दिला. असे असले तरीही त्यांच्यासमोर काही मोठी आव्हाने आहेत. किंबहुना, पहिल्या पर्वापेक्षा हा कालखंड आव्हानात्मक

केवड्याला फळ येत नाही, पण त्याच्या सुगंधाने तो अवघ्या जगाला मोहवून टाकतो.

राहाणार आहे. ही आव्हाने जयशंकर आणि मोदी सरकार कशा प्रकारे पेलते यावर दुसऱ्या पर्वाचे यश विसंबून राहाणार आहे.

**सार्कला वळसा, 'बिमस्टेक'ला चालना**

पंतप्रधानांनी आपल्या शपथविधी समारंभासाठी बिमस्टेक परिषदेच्या देशांना बोलावले होते. याचे कारण सार्क संघटनेच्या माध्यमातून जी उद्दिष्टे ठेवण्यात आली ती पूर्ण होत नव्हती. स्थापना होऊन तीन दशके लोटली तरीही सार्कची म्हणावी तशी प्रगती झालेली नाही. याचे प्रमुख कारण पाकिस्तानचे आडमुठे धोरण. सार्कचे शेवटचे १८ वे अधिवेशन २०१४ मध्ये काठमांडू येथे झाले. त्यात भारताने इंटिग्रेशन आणि कनेक्टिव्हिटीचा नारा दिला. परंतु पाकिस्तानच्या अडथळ्यांमुळे या दोन्हीही पातळ्यांवर काहीही झाले नाही. त्याचप्रमाणे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादही तसाच सुरू राहिल्यामुळे भारताने पाकिस्तानला आणि पर्यायाने सार्कला बाजूला करण्याचे धोरण अवलंबिले. यासाठी भारताने 'बिमस्टेक' या संघटनेला जवळ केले. 'बिमस्टेक'मध्ये सात सदस्य देश असून त्यातील पाच दक्षिण आशियाई आणि दोन दक्षिणपूर्व आशियाई देश आहेत. त्यामुळे 'नेबरहूड फर्स्ट' हे मोदींच्या परराष्ट्र धोरणाचे केंद्रस्थान राहणार आहे. यामध्ये 'सार्क' ऐवजी बिमस्टेकवर भर देण्यात येणार आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणाची दिशा यातून स्पष्ट होते आहे.

**१. आव्हान शेजारी देशांमधील प्रकल्पपूर्तीचे**

बिमस्टेक हा दक्षिण आशिया आणि दक्षिणपूर्व आशिया यांना जोडणारा दुवा मानला जातो. बिमस्टेकच्या माध्यमातून भारताला ईशान्य भारताचा विकास करायचा आहे. त्या माध्यमातून दक्षिण पूर्व किंवा आग्नेय आशियाई देशांबरोबर भारताचा व्यापार वाढवत २०० अब्जापर्यंत न्यायचा आहे. भारताने २०१६ नंतर या संघटनेत रस घ्यायला सुरुवात केली खरी; पण 'बिमस्टेक'ला यशस्वी करण्यासाठी जी आश्वासने दिली आहेत किंवा विकासात्मक प्रकल्प पूर्ण करण्याच्या ज्या घोषणा केल्या आहेत त्यांची पूर्तता करण्यात भारत कमी पडतो आहे. त्यामुळे बिमस्टेक देशांचा विश्वास जिंकायचा असेल आणि त्या संघटनेच्या माध्यमातून आपले आर्थिक हितसंबंध साधायचे असतील तर या आश्वासनांची पूर्तता करावी लागेल आणि तेच मोदी-२ सरकारच्या परराष्ट्र धोरणापुढे पहिले आव्हान असणार आहे. नेपाळ, भूतान, बांग्लादेश, थायलंड, म्यानमार या देशांमध्ये भारताने सुरू केलेले विकास प्रकल्प अपूर्ण आहेत. ते पूर्ण करण्यासाठी मोदींना इच्छाशक्ती दाखवावी लागणार आहे. दुसरे महत्त्वाचे म्हणजे ईशान्य भारतातून म्यानमार, थायलंडमधून जाणारा रस्ता मार्ग २७०० किलोमीटरचा आहे. तो २०१८ मध्येच पूर्ण होणे अपेक्षित होते; पण तो अपूर्ण आहे. हा रस्तामार्ग भारत, म्यानमार आणि थायलंड या तीन राष्ट्रांना जोडणारा आहे. तो पूर्ण झाला तर त्याचा भारताला खूप फायदा होणार आहे. तसेच नेपाळ आणि भूतान हे देशही भारताच्या माध्यमातून दक्षिणपूर्व आशियाई देशांबरोबर व्यापार करू शकणार आहेत. पण हा प्रकल्प अर्धवट आहे. याबाबत आपण चीनचे उदाहरण घेतल्यास प्रकल्पांची घोषणा करणे आणि ते पूर्णत्त्वास नेणे याबाबत चीन नेहमीच अग्रेसर राहिला आहे. त्यामुळे या देशांमध्ये चीनविषयी विश्वास निर्माण होण्यास हातभार लागतो. या पार्श्वभूमीवर भारताला विश्वासार्हता टिकवायची असेल तर प्रकल्प तत्काळ पूर्ण करावे लागतील.

**२. अमेरिकेच्या निर्बंधांचा सामना**

मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळाची सुरुवात होण्यापूर्वीच लोकसभेच्या निवडणुकांदरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताने इराणकडून तेलआयात करू नये यासाठी दिलेली सहा महिन्यांची मुदत संपुष्टात आणली. त्यामुळे भारताने आता इराणकडून

भूतकाळ आपल्याला आठवणींचा आनंद देतो, भविष्यकाळ आपल्याला स्वप्नांचा आनंद देतो,
पण आयुष्याचा आनंद फक्त वर्तमानकाळच देतो.

तेलआयात थांबवली आहे. भारत जवळपास ४.५० लाख बॅरल इराणकडून प्रतिदिवशी तेल आयात करत होता. आता इराणचा पर्याय बंद झाल्यामुळे ही गरज भागवण्यासाठीची तजवीज करावी लागणार आहे. इराणप्रमाणे स्वस्त तेल आपल्याला अन्य देशांकडून मिळण्याच्या शक्यता फार कमी आहे. तसेच इराणकडून तेलाची देयके अदा करण्यासाठी दिली जाणारी सवलत, विमा संरक्षणही इतर देशांकडून मिळणार नाही. त्यामुळे तेलाचा प्रश्न गंभीर बनणार आहे. याचा परिणाम चालू खात्यावरील तूट वाढण्यावर होणार आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात भारताला या प्रश्नाबाबत पुन्हा एकदा अमेरिकेबरोबर नव्याने चर्चा करावी लागणार आहे. तेलाबरोबरच इराणमध्ये छाबहार बंदर विकसित करण्याचे काम भारताने हाती घेतले आहे. यासाठी लक्षावधी डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. अमेरिकेच्या इराणवरील निर्बंधांमुळे या बंदराचे काय होणार, त्या गुंतवणुकीचे काय होणार हा देखील एक प्रश्न आहे. हे आव्हान पेलताना नव्या सरकारचा कस लागणार आहे.

याखेरीज भारताने अलीकडेच रशियाशी एक करार केला असून त्यानुसार एस ४०० ही क्षेपणास्त्रविरोधी प्रणाली भारत रशियाकडून आयात करणार आहे. याची अंदाजे किंमत ५ अब्ज डॉलर्स इतकी आहे. पण सध्या अमेरिकेने रशियावरही बहिष्कार टाकलेला आहे. अमेरिकेची इच्छा आहे की, भारताने या बहिष्काराला पाठिंबा द्यावा. अशा परिस्थितीत रशियाकडील हे क्षेपणास्त्रविरोधी तंत्रज्ञान कसे विकत घेणार हा मोठाच प्रश्न निर्माण झाला आहे.

अफगाणिस्तानातून अमेरिका स्वतःचे आणि नाटोचे सैन्य काढून घेण्याच्या विचारात आहे. त्यासाठी तालिबानबरोबर सुरू असणाऱ्या चर्चांना यश येईल असे दिसते आहे. अमेरिकेने नाटोचे सैन्य काढून घेतले तर अफगाणिस्तानात तालिबानचे साम्राज्य पुन्हा प्रस्थापित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. १९७९-१९८९ या काळात सोव्हिएत सैन्य अफगाणिस्तानात होते. हे सैन्य बाहेर पडल्यानंतर १९९१-१९९२ मध्ये अफगाणिस्तानात अस्थिरता निर्माण झाली आणि १९९६ मध्ये तालिबानचे साम्राज्य प्रस्थापित झाले. आता पुन्हा तशीच परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही शक्यता विचारात घेऊन भारताने अफगाणिस्तानातील तालिबानबरोबर चर्चा करावी, असा एक मतप्रवाह आहे. त्याबाबतचा निर्णयही परराष्ट्रमंत्री जयशंकरन आणि पंतप्रधान मोदी यांना घ्यावा लागणार आहे.

### ३. दहशतवादाचे आव्हान

मोदी-२ सरकारच्या परराष्ट्र धोरणापुढे पुढचे आव्हान आहे ते आयसिस या संघटनेचे. ह्या संघटनेचे मूळ इराक आणि सीरियामध्ये होते. तिथून या संघटनेचा पाडाव झाल्याने आयसिस नव्या भूभागाच्या शोधात आहे. आयसिसचे स्थलांतर पश्चिम आशियाकडून दक्षिण आशियाकडे झालेले आहे. दक्षिण आशियातील बहुतांश देशांना आयसिसचा धोका भेडसावत आहे. यामध्ये पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांग्लादेश, मालदीव, श्रीलंका, भारत यांचा समावेश आहे. अलीकडेच श्रीलंकेत जे भीषण हल्ले झाले ते सर्व आयसिसने घडवले होते. त्याचप्रमाणे मालदीवला देखील अशा स्वरूपाचा धोका आयसिसकडून आहे. म्हणूनच नरेंद्र मोदी यांनी मालदीव आणि श्रीलंकेच्या दौऱ्यादरम्यान आयसिसचा आणि एकंदरीतच दहशतवादाचा सामना करण्यासाठी सामूहिक फळी कशी निर्माण करता येईल या दृष्टीने विचार झाला.

### ४. चीनच्या आक्रमतावादाचा धोका

आज चीनचा लष्करी आधुनिकीकरण आणि लष्करावरील खर्च झपाट्याने होत आहे. चीनचा लष्कराचा अर्थसंकल्प हा १७४ अब्ज डॉलर एवढा आहे. त्यामानाने भारताचा अर्थसंकल्प ५० अब्ज

डॉलर्सचा आहे. हा खर्च जसजसा वाढत चालला आहे तसतशी चीनची अरेरावी वाढते आहे. केवळ दक्षिण चीन समुद्रातच नव्हे तर बंगालच्या उपसागरामध्ये, अरबी समुद्रामध्ये त्याचप्रमाणे हिंदी महासागरामध्ये आणि एकूणच आशिया प्रशांत क्षेत्रात चीन आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न करतो आहे. एवढेच नव्हे तर, चीनने भारताच्या सीमेवर मोठ्या प्रमाणावर लष्कर तैनात करायला सुरुवात केली आहे. अरुणाचल प्रदेश हा आपलाच भूभाग असल्याचा दावा चीन करत आहे. चीनच्या ओबीओआर प्रकल्पाला विरोध करत भारताने त्यावर बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे चीन नाराज आहे. अशा स्थितीतील चीनचा कशा पद्धतीने सामना करायचा हे मोदी सरकारपुढे आव्हान असणार आहे.

**५. आडमुठ्या ट्रम्प यांचे आव्हान**

भारत-अमेरिका यांच्यातील मैत्री गेल्या वीस वर्षांपासून सुदृढ होणारी मैत्री आहे. पण अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प विराजमान झाल्यापासून ते नित्यनवे आणि तडकाफडकी निर्णय घेत चालल्यामुळे या मैत्रीच्या भवितव्याबाबत काहीशी चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडील काळात घेतलेले अनेक निर्णय भारतविरोधी किंवा भारतासाठी नुकसानदायक ठरले आहेत. इराणकडून तेलआयात थांबवण्याच्या निर्णयाबरोबरच अमेरिकेने जनरलाईज्ड सिस्टिम ऑफ प्रेफरन्सेस अंतर्गत भारताला मिळणारी पाच अब्ज डॉलर्सची सवलत काढून टाकली आहे. तसेच व्हिसाच्या बाबतीतही ट्रम्प यांचे धोरण आडमुठेपणाचेच आहे. ट्रम्प यांच्या सध्याच्या भूमिका आणि वक्तव्ये पाहता भारत-अमेरिका यांच्यात व्यापारयुद्ध सुरू होईल की काय अशी परिस्थिती आहे. भारतीय बाजारपेठेत अमेरिकेला अधिकाधिक संधी मिळवून द्यावी आणि अमेरिकेकडून आयात होणाऱ्या वस्तूंवरील अतिरिक्त शुल्क काढून टाकावे यासाठी ट्रम्प भारतावर दबाव आणताहेत. याचाही सामना जयशंकरन यांना करावा लागणार आहे. जयशंकरन हे अमेरिकेत भारताचे राजदूत होते. त्यामुळे त्यांना अमेरिकेत काम करण्याचा अनुभव आहे. हे अनुभवकौशल्य पणाला लावून त्यांना या परिस्थितीतून मार्ग काढावा लागेल.

**आर्थिक हितसंबंध साधण्याचे आव्हान**

मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणापुढे सर्वात मोठे आव्हान असेल ते भारताचे आर्थिक हितसंबंध जोपासण्याचे. यावर्षी भारताच्या विकासाचा दर अचानक खालावला आहे. बेरोजगारी वाढली आहे. अशा परिस्थितीत परकीय गुंतवणूक भारतात येणे आणि ती वाढणे महत्त्वाचे आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढणे गरजेचे आहे. परकीय गुंतवणूक वाढली, साधनसंपत्तीचा विकास झाला तरच मेक इन इंडियासारखे प्रकल्प पूर्ण होऊ शकतील. या दृष्टीने जयशंकरन यांना प्रयत्नशील रहावे लागेल. परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून भारताचा आर्थिक विकास कसा उंचावेल, चीनबरोबरचा व्यापार कसा वाढवता येईल, त्यातील व्यापारतूट कशी कमी करता येईल, त्यासाठी कशा वाटाघाटी कराव्या लागतील, डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी वाटाघाटी करून व्यापारी हितसंबधांचे रक्षण कसे करता येईल ही सर्व महत्त्वाची आव्हाने जयशंकरन आणि मोदी सरकारपुढे आहेत. पुढील पाच वर्षांचा काळ हा जयशंकरन यांच्या परीक्षेचा काळ आहे असे म्हटले पाहिजे. परंतु त्यांचा अनुभव, प्रशिक्षण याचा विचार करता तसेच पंतप्रधान मोदी यांनी स्वतः परराष्ट्र धोरणात घातलेले लक्ष पाहता ते या समस्यांचा सामना यशस्वीपणे करतील अशी आशा आहे.

**– डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
परराष्ट्र धोरण विश्लेषक,
विशेष अधिकारी, उच्च शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन, मुंबई.
भ्रमणध्वनी – ९७०२०३५८००

गरुडा इतके उडता येत नाही म्हणून चिमणी कधी उडण्याचे सोडत नाही,
अहंकार विरहीत लहान सेवाही मोठीच असते.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा २०१८ - १९ :**

| इयत्ता | परीक्षेस बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी |
|---|---|---|
| ५ वी | ५ | ४ |
| ६ वी | ७ | ६ |
| ७ वी | १९ | १७ |
| ८ वी | २५ | १९ |
| ९ वी | ६ | ५ |
| १० वी | ४९ | ४८ |

सर्वात जास्त गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :

| इ. | विद्यार्थ्याचे नाव | गुण |
|---|---|---|
| ५ वी | अदित्य इंदाप | ७४ |
| ६ वी | ओजस करमरकर | ६० |
| ७ वी | हर्षल पेडणेकर | ८४ |
| ८ वी | इशान फणसे | ८६ |
| ९ वी | सोहम सावंत | ६६ |
| १० वी | साशा गोरे | ८८ |

**महाराष्ट्रभाषा आयोजित हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा २०१८ - २०१९ चा निकाल :**

| इ. | परीक्षेचे नाव | उपस्थित विद्यार्थी | निकाल | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विशेष प्रावीण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
| ५ वी | बालबोधिनी | ०७ | ०२ | ०३ | ०१ | - |
| ६ वी | प्राथमिक | १४ | ०५ | ०९ | - | - |
| ७ वी | प्रवेशिका | ०३ | - | - | ०२ | ०१ |
| ८ वी | सुबोध | ०२ | - | ०२ | - | - |

विशेष प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे :

इ. ५ वी : अवनी भडकमकर, अदित्य खोल्लम

इ.६ वी : संकल्प कोरे, शार्दुल अढव, परिणिता अंबेटकर रुचिर दामले, सावरी रसाळ

**भूगोल प्रज्ञशोध केंद्र आयोजित भूगोल प्रज्ञशोध परीक्षा २०१८ - २०१९ चा निकाल : १००%**

सर्वात जास्त गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :

| इ. | विद्यार्थ्याचे नाव | गुण |
|---|---|---|
| ५ वी | शार्दुल खोपकर | ८२ |
| ६ वी | अस्मित वाणी | ८० |
| ७ वी | भूमी वैती | ८४ |
| ८ वी | वंश जैन | ६२ |

---

आपल्या आयुष्यात कोण येणार हे वेळ ठरवते, परंतु आपल्या आयुष्यात कोण यायला पाहिजे हे मन ठरवते, आणि आपल्या आयुष्यात कोण टिकून राहणार हे मात्र आपला स्वभावच ठरवतो.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### ठाण्याच्या विद्यार्थ्यांची सावरकर जयंती लंडनमध्ये साजरी




ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने जोशी बेडेकर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी २८ मे रोजी सावरकरांची १३६वी जयंती लंडनमध्ये साजरी केली. विपीएम्स लंडन अकॅडमी ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च व महाराष्ट्र मंडळ, लंडन यांच्या संयुक्त विद्यमाने सावरकरांची काव्यप्रतिभा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

सावरकरांची ओळख समस्त हिंदुस्तानात एक क्रांतिकारक व स्वातंत्र्यवीर म्हणून प्रकर्षाने होते, मात्र त्यांच्या कवितेत असलेल्या साहित्यिक अभिरुचिकडे म्हणावे तितके लक्ष दिले जात नाही. नेमकी हीच कल्पना घेऊन सावरकरांच्या लंडन वास्तवातील कवितांचे विवेचक रसग्रहण करण्याची कल्पना डॉ. विजय बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाण्याच्या जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या जनसंज्ञापन विभागातील प्रा. डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी मांडली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. विजय बेडेकर यांनी सावरकरांच्या कवितेचा चिकित्सक अभ्यासाची गरज विशद करताना लंडनच्या महाराष्ट्र मंडळाने सावरकरांवरील कार्यक्रम आयोजित केल्या बद्दल आभार मानले. तसेच महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षा श्यामल पितळे यांनी याप्रसंगी आपले विचार मांडले.

१९०६ ते १९१० या चार वर्षात सावरकर लंडन येथे बॅरिस्टर होण्यासाठी गेले; या चार वर्षांतील सावरकरांनी लिहिलेल्या कविता या कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी होत्या. मराठी साहित्यात अजरामर झालेले गीत ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला सावरकरांनी ब्रायटनच्या समुद्रकिनाऱ्यावर लिहिले. तसेच मुंबईहून लंडनला बोटीने प्रवास करताना सावरकरांनी तारकांस पाहून ही नितांतसुंदर कविता लिहिली. मारसेलिसची उडी विफल गेल्यास भारतात परतत असताना 'अनादि मी अनंत मी अवध्य मी मला, मारील रिपू जगती असा कवण जन्मला? ही कवचमंत्रासारखी कविता लिहिली. सावरकरांनी मराठी कवितेला वैनायक नावाचे एक नवे वृत्त दिले. सावरकरांनी इयत्ता सहावीत असताना Lady of Lake या प्रसिद्ध इंग्रजी कवितेचे मराठीत काव्यमय भाषांतर केले. सावरकरांची ऊर्जस्वल मराठी कविता इंग्रजीत भाषांतरीत करून सांगितल्यामुळे लंडनमधील अमराठी श्रोत्यांनाही एक वेगळा आनंद झाला.

सावरकरांनी इंग्रजीत लिहिलेली The Revolutionist to Himself ही कविता कार्यक्रमात आवर्जून सादर केली गेली. सावरकरांवर असलेला इंग्रजी कवी जॉन मिल्टन व त्याच्या Blank Verse चा प्रभाव याचंही विश्लेषण डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी केलं.

लंडन मधील महाराष्ट्र मंडळात सावरकर जयंती निमित्त सादर झालेल्या या कार्यक्रमाला सावरकर प्रेमींनी गर्दी केली होती. या कार्यक्रमाच्या शेवटी सावरकरांनी लिहिलेल्या संन्यस्त खड्ग या नाटकातील एक प्रवेश दिव्येश बापट व युवराज ताम्हणकर यांनी सादर केला. कार्यक्रमातील गीते सुमेधा बेडेकर, अंजली डोंगरे यांनी

सुरेल आवाजात सादर करत लँडनवासीयांची दाद मिळवली. या कार्यक्रमाचे दिग्दर्शन, संहिता लेखन व सूत्रसंचालन डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी केले.

तत्पूर्वी महाविद्यालयाच्या २९ विद्यार्थ्यांच्या चमूने सावरकर १९०६ ते १९१० दरम्यान ज्या इंडिया हाऊस मध्ये राहिले त्या वास्तुचेही दर्शन घेतले. याप्रसंगी डॉ. विजय बेडेकर व डॉ. सुधाकर आगरकर यांनी सावरकरांच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानावर प्रकाश टाकला. हा लंडनच्या शैक्षणिक सहलीचा उपक्रम मागच्या सोळा वर्षांपासून प्रत्येक वर्षी साधारणतः मे महिन्यात आयोजित करण्यात येतो. यातून विद्यार्थ्यांना इंग्लंडच्या ऑक्सफर्ड, केम्ब्रिज व लंडन मधील शैक्षणिक संस्था, ग्रंथालये व संग्रहालयाची ओळख व्हावी या उद्देशाने ही सहल आयोजित होते असे विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी सांगितले.

**राष्ट्रीय सेवा योजना–NSS**

कार्यक्रमाचे स्वरूप– राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिरात बांधण्यात आलेल्या वनराई बंधाऱ्यातील मातीचे पावसाळ्यापूर्वी योग्य पद्धतीने संवर्धन करणे.

दिनांक– १० जून २०१९

सहभागी स्वयंसेवक– ६ आणि एक शिक्षक



**स्थळ– टाकीपठार येथील ओहळ**

वनराई बंधारा बांधण्यात वापरण्यात आलेल्या मातीने भरलेल्या पिशव्या योग्य उंच ठिकाणी स्थानांतरित करणे आवश्यक असते. याद्वारे वनराई बंधाऱ्यात वापरलेली माती वाया जात नाही. पावसाळा संपल्यानंतर याच मातीचा पुन्हा वापर केला जातो. यामुळे मृदेचे संवर्धन आणि वेळेची बचत होते.

**योग दिवस**




विवेकानंद अध्ययन केंद्र, एन एस एस, एन सी सी, विवेकानंद केंद्र व दैनिक तरुण भारत यांच्या सहकार्याने महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस २१ जून रोजी साजरा झाला. यासाठी डॉ. अमित मिश्रा, डॉ. वरदराज बापट यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ३५ शिक्षक व ६० विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी योगाचे महत्त्व आपल्या प्रास्ताविकात व्यक्त केले.

डॉ. इंद्राणी रॉय यांनी संयोजन केले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**मे २०१९ मधील कार्यक्रम / वार्ता**

१ मे: डॉ. नीतिन जोशी यांना महाराष्ट्र दिवसाच्या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जोशी बेडेकर कॉलेज येथे आमंत्रित करण्यात आले.



४ मे: डॉ. स्मिता जपे, डॉ. पल्लवी, डॉ. मीनाक्षी आणि प्रा. कुणाल यांनी रिसर्च फोकस ग्रुपच्या अंतर्गत सारांश आणि परिचय लेखनावर आधारित एक उपक्रम घेतला.

४ मे: पुणे येथे झालेल्या उच्च शिक्षण मानव संसाधन परिषदेत डॉ. व्ही. एन. बेडेकर इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (ब्रीम्स) ला उद्योग-शैक्षणिक सहयोगासाठी उत्कृष्ट संस्था पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ब्रीम्सच्या असोसिएट प्रोफेसर डॉ. स्मिता जपे यांनी संस्थेच्या वतीने हा पुरस्कार स्विकारला. तसेच या परिषदेत डॉ. जपे यांना चर्चासत्राच्या सदस्य म्हणून आमंत्रित करण्यात आले होते त्यांनी, 'खाजगी संस्थांशी निगडित नियमक आव्हाने' (Regulatory challenges faced by Private Institutions) या विषयावर आपली मते मांडली.





११ मे: डॉ. नीतिन जोशी यांनी पितांबरी प्रायव्हेट लिमिटेड येथे सल्ला सेवा उपक्रमाचे आयोजन केले.

११ मे: प्रा. कृणाल यांनी ब्रीम्स येथे हेल्थकेअर मॅनेजमेंट समिट २०१९ चे आयोजन केले.







१३ आणि १८ मे: ब्रीम्स येथे प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी संशोधन प्रकाशन गुणवत्ता सुधारण्याच्या उद्देशाने रिसर्च फोकस ग्रुपच्या अंतर्गत प्राध्यापक सदस्यांसाठी एका सत्राचे आयोजन केले.

२१ मे: जे.जे.टी.यू. विद्यापीठासाठी लेखा आणि वित्त विषयातील सह-मार्गदर्शक म्हणून काम करण्यासाठी डॉ. स्मिता जापे यांना मान्यता मिळाली.

आपण कसे दिसतो ह्यापेक्षा कसे असतो याला अधिक महत्त्व आहे.

२३ मे: डॉ. स्मिता जपे यांनी आशिदा इलेक्ट्रॉनिक्स, डिजिकेअर, स्टालवार्ट, एस बी आय इन्शुरन्स आणि निधी ब्रोकिंग या कंपन्यांसाठी सल्लागार सेवांसंबंधी करार करण्यासाठी समन्वय साधला.

२९ मे : यू.जी.सी. मान्यताप्राप्त नियतकालिक इंटरनॅशनल जर्नल ऑफ मॅनेजमेंट, (आयजेएमआयई) मध्ये प्रा. महेश भानुशाली यांनी लिहिलेला, कंपॅरेटिव्ह ॲनालिसीस ऑफ पर्सेप्शन्स ऑफ काँसुमर्स अँड रिटेलर्स ॲट ब्रिटानिया (Comparative Analysis of Perceptions of Consumers and retailers at Britannia) हा शोध निबंध प्रकाशित झाला.

२५ मे: रिसर्च टीमचे सदस्य डॉ. स्मिता जपे, डॉ. मीनाक्षी आणि डॉ. पल्लवी यांनी रिसर्च फोकस ग्रुप अंतर्गत रिसर्च गॅप आइडेंटिफिकेशन याविषयावर इतर शिक्षक सदस्यांशी चर्चा केली.

३० मे: ब्रीम्स, NAAC प्रमाणपत्रासाठीचा पहिला टप्पा पार करून परीक्षणासाठी पात्र.

प्रा. दीप्ती यांनी पीजीडीएम अभ्यासक्रमाचे विद्यार्थी, निष्ठा ठाकूर आणि सुदर्शन जोशी यांच्या सिंगापूरमधील Affluent Software Innovation या कंपनीत आंतरराष्ट्रीय इंटर्नशिपसाठी प्रयत्न केले आणि आणि त्यांची निवड देखील झाली.



Nishtha Thakur



Sudarshan Joshi

प्रा. कृणाल के. पुंजानी यांच्या शोधनिबंधाला स्कोपस इंडेक्सेडच्या यादीत असलेल्या आणि ज्याचा एच-इंडेक्स गुण क्रमांक ४९ आहे अशा बेंचमार्किंग या आंतरराष्ट्रीय नियतकालिकामधे प्रकाशित करण्यासाठी स्वीकारले गेले. तसेच यूजीसी मान्यताप्राप्त नियतकालिक इंटरनॅशनल जर्नल ऑफ मॅनेजमेंट, आय टी अँड इंजिनिरींग या नियतकालिकामधे देखील प्रा. कृणाल के. पुंजानी याचा शोधनिबंध स्वीकारला गेला.

•••

---

(पृष्ठ क्र.२८ वरून - **प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था**)

हा विषय त्यांतल्या त्यांत अधिक माहितीपूर्ण कसा होईल याचा प्रयत्न या लघुनिबंधांत करण्यात आला आहे.

या विषयावरील 'अपराजितपृच्छा', 'कामिकागम' आणि 'कौटिलीय अर्थशास्त्र' या ग्रंथातील विवेचन या आधी देण्यात आले आहे. यापुढील लेखनांत 'मानसार', 'मयतम्' आणि 'समराङ्गणसूत्रधार' या ग्रंथात दिलेल्या विवेचनाचा भाग यापुढे देण्यात येत आहे.

'मानसार' या ग्रंथातील विवेचन यापुढे देण्यात येत आहे. 'मानसार' हा ग्रंथ 'राजा मानसार' याने लिहिला असे मानण्यात येते. 'राजा मानसार' आणि 'राजा राजहंस' या दोघांत युद्धे होत असत असे उल्लेख सापडतात. 'राजा राजहंस' हा मगध देशाचा राजा होता. 'दण्डि' याच्या 'दशकुमारचरितम्' या ग्रंथात उल्लेखित केलेला 'राजवाहन' हा राजा हा 'राजहंसाचा' पुत्र (दशकुमारचरितम् या ग्रंथातील) राजवाहन हा दशकुमारचरितांतील दहा राजपुत्रांपैकी एक असे मानले जाते. 'मानसार' ग्रंथाची रचना ५५० ते ६५० या शतकात झाली असे मानले जाते.

(क्रमशः)

**- मधुकर गजानन दातार**

•••

---

पाणी धावतं, म्हणून त्याला मार्ग सापडतो. त्याप्रमाणे जो प्रयत्न करतो त्याला यशाची, सुखाची, आनंदाची वाट सापडते.

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

मिळून राबविलेला संयुक्त प्रकल्प देखील या कॉलेजमध्ये सध्या कार्यान्वित आहे. यात बरेच भारतीय लोक काम करतात.

केंब्रिजची भेट आटोपून आम्ही लंडनला पोहोचलो. या शहरात बघण्यासारखे खूप आहे. परंतु आम्ही आपले लक्ष केंद्रित केले ते ग्रीनविच भूमध्य रेखा, मॅरिटाईम म्युझियम, ब्रिटिश संग्रहालय, ब्रिटिश वाचनालय आणि चार्लस डार्विन यांचे घर यावर. या भेटींतून खूप शिकायला मिळाले. भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास हा आपला सगळ्यांचाच जिव्हाळ्याचा विषय आहे. त्याची सुरुवात लंडनमधूनच झाली. उच्च शिक्षण घेण्यासाठी जी भारतीय मंडळी इंग्लंडला गेली त्यांनी तिथे चळवळीला सुरुवात केली. यामध्ये शामजी कृष्णा वर्मा, महात्मा गांधी, सरदार पटेल, विनायक दामोदर सावरकर अशा अनेक भारतीय विद्वानांचा समावेश होतो. योगायोगाने ज्या कालावधीत आम्ही लंडनमध्ये होतो त्याच कालावधीत सावरकरांची जयंती होती. त्यांच्या जन्मदिवशीच म्हणजे २८ मेला सावरकर ज्या घरी राहायचे त्या इंडिया हाऊसला भेट देण्याची आम्हाला संधी मिळाली. त्याचबरोबर लंडनमधील महाराष्ट्र मंडळाच्या मदतीने सावरकारांच्या कवितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. १९०६ ते १९१० अशी चार वर्षे सावरकरांनी इंग्लंडमध्ये घालविली. या चार वर्षांत त्यांनी रचलेल्या कविता आमच्या चमूतील लोकांनी सादर केल्या. महाराष्ट्र मंडळाच्या सभासदांनी कार्यक्रमाचे मनापासून कौतुक केले आणि दरवर्षी असा कार्यक्रम आयोजित करण्याचे आश्वासन दिले.

विद्या प्रसारक मंडळाने आयोजित केलेल्या या सहलीला आम्ही शैक्षणिक सहल म्हणतो. याचे कारण या सहलीत मनोरंजनापेक्षा ज्ञान ग्रहणाला जास्त महत्त्व आहे. त्याची सुरुवात सहल सुरू होण्याच्या चार महिने आधीच होते. व्याख्याने, चित्रफिती यांच्या मदतीने आम्ही सभासदाना काय पाहायचे आहे याचे प्रशिक्षण देतो. त्याचबरोबर माहितीच्या महाजालातून आवश्यक ती माहिती शोधण्यासाठी आम्ही त्यांना उद्युक्त करतो. प्रत्यक्ष भेटीच्या आधी जिथे जायचे आहे त्या ठिकाणाची थोडक्यात माहिती दिली जाते. रोज संध्याकाळी आज काय पाहिले याची उजळणी केली जाते. रोजनिशी लिहिणे हा आमच्या सहलीचा एक अविभाज्य भाग आहे. रोज कुणाची ना कुणाची रोजनिशी वाचली जाते. त्यामुळे आपण कोणते ठिकाण पाहिले आणि त्याची वैशिष्ट्ये कोणती याची नोंद प्रत्येक सभासदांकडे असते.

मागील पंधरा वर्षे शैक्षणिक सहलीचे नियमितपणे आयोजन करण्यात येत आहे. आजपर्यंत ३०० हून जास्त लोकांनी या सहलीचा फायदा घेतलेला आहे. यामध्ये सुमारे १५० शिक्षक, १०० विद्यार्थी आणि ५० पालक यांचा समावेश होतो. या प्रत्येकाला विद्या प्रसारक मंडळाच्यावतीने ५ सप्टेंबर रोजी पदवीदान समारंभाच्या निमित्ताने प्रमाणपत्र दिले जाते. विद्यार्थी, शिक्षक आणि पालक या तीनही गटातील सभासदांनी ही सहल उपयुक्त असल्याचे आम्हाला सांगीतले. इंग्रजांची ज्ञानलालसा, त्यांच्या देशातील वाहतूक व्यवस्था, त्यांचा वक्तशीरपणा या बाबींचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर दूरगामी परिणाम होतात असे आमच्या लक्षात आले आहे. अनेक विद्यार्थांनी या सहलीने आम्हाला पुढील शिक्षणाची दिशा मिळाली असे सांगीतले आहे. एकंदरीत पाहता इंग्लंड सहलीचा शैक्षणिक उद्देश बऱ्यापैकी यशस्वी होतो आहे असे दिसते. विद्या प्रसारक मंडळाच्या विविध संस्थेतील विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी या संधीचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन मी करू इच्छितो.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.